भारतीय समाजमनाचं प्रतिबिंब

# द ग्लोबल टाइम्स

■ epaper.theglobaltimes.co.in

वर्ष ८ ■ अंक ३३० ■ पाने ८ ■ मुंबई, बुधवार, २ डिसेंबर २०२० ■ मूल्य ₹ ३.०० ■ नोंदणी क्र. MAHMAR/2012/44621

**थोडक्यात**

## आ. प्रताप सरनाईक, त्यांचा मुलगा विहंग यांना ईडीकडून समन्स

■ रामचंद्र खडपे

ठाणे : शिवसेना आमदारप्रताप सरनाईक याना ईडीकडून समन्स बजावण्यात आलेत. टॉप ग्रुप आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात त्यांना हा समन्स बजावले आहे. तसेच प्रताप सरनाईक यांचा मुलगा विहंग सरनाईक यांना ईडीन समन्स बजावला आहे. त्यामुळे प्रताप सरनाईक आणि विहंग सरनाईक यांना चौकशीसाठी ईडीच्या कार्यालयात हजर राहावे लागणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या गुरुवारी दुपारी चौकशीसाठी हजर राहण्याची माहिती मिळते आहे. ईडीच्या समन्सला सरनाईक पिता पुत्रांनी अद्याप काही उत्तर न दिल्याची माहिती मिळत आहे. आज प्रताप सरनाईक यांचा क्वारटाईनचा कालावधीती संपणार आहे. २५ नोव्हेंबरला प्रताप सरनाईक याच्या घर आणि कार्यालयावर धाड टाकली होती. विहंग आणि पूर्वेश सरनाईक यांच्या घरीही छापे मारले होते. आमदार प्रताप सरनाईक यांचा मुलगा विहंग सरनाईक सोमवारी चौथ्यांदा ईडीच्या चौकशीसाठी गैरहजर राहिले होते. तर दुसरीकडे प्रताप सरनाईक यांचा क्वारंटाइनचा कालावधी संपत असल्याने त्यांनाही पुन्हा ईडीकडून समन्स बजाविण्यात आले आहे.

## उलट इतर राज्यातील उद्योजकही महाराष्ट्रात येतील

### मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला विश्वास

मुंबई : "महाराष्ट्र हे मॅग्नेटिक राज्य आहे. उद्योजकांना आजही राज्याचे आकर्षण कायम आहे. राज्यातील कोणतेही उद्योग बाहेर जाणार नाहीत. उलट इतर राज्यातील उद्योजकही महाराष्ट्रात उद्योगासाठी येतील," असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला आहे. इंडियन मर्चंट चेंबर ऑफ कॉमर्स यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. वेब माध्यमातून या कार्यक्रमाला उद्योगमंत्री सुभाष देसाई, आयएमसीचे अध्यक्ष राजीव पोद्दार यांच्यासह इतर उद्योजक उपस्थित होते.

उद्धव ठाकरे म्हणाले, "मॅग्नेटीक महाराष्ट्रासाठी इंडियन मर्चंट चेंबर ऑफ कॉमर्स पुढाकार घेत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. मॅग्नेटीक या शब्दात मोठी ताकद आहे. महाराष्ट्राला एक इतिहास आहे. महाराष्ट्र एक सर्वार्थाने वेगळे राज्य आहे. इथे वेगळे संस्कार आहेत. त्यामुळे येथे येऊन कुणी काही घेऊन जाऊ शकत नाही. स्पर्धेला आम्ही घाबरत नाही. पण कुणी ओढून ताणून येथून काही घेऊन जाणार असेल, तर शक्य होणार नाही. महाराष्ट्रात नवीन गुंतवणूक येते आहे. इंडियन मर्चंट चेंबर ऑफ कॉमर्स महाराष्ट्रातील या बदलाचे ११३ वर्षे जुने साक्षीदार आहे. त्यामुळेच तुम्हीच महाराष्ट्राचे ब्रॅंड अम्बॅसिडर आहात. महाराष्ट्राच्या यशाची गाथा, गोष्टी तुम्हीच इतरांना सांगू शकता. कुठलीही अडचण असेल, तर ती दूर करण्यात सरकार तुमच्या सोबत असते. हे तुम्हाला सांगता येईल.

# महाराष्ट्रात ६ हजारांपेक्षा जास्त रुग्णांना डिस्चार्ज

## रिकव्हरी रेट ९२ टक्क्यांवर

मुंबई : आज महाराष्ट्रात ६ हजार २९० रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. राज्यात आजपर्यंत एकूण १६ लाख ९१ हजरा ४१२ रुग्णांनी करोनावर मात केली आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण अर्थात रिकव्हरी रेट हा ९२.४९ टक्के इतका झाला आहे. आज राज्यात ४ हजार ९३० नव्या रुग्णांचं निदान झालं आहे. तर ९५ मृत्यूंची नोंद झाली आहे. राज्यातील मृत्यू दर हा २.५८ टक्के इतका आहे. महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने ही माहिती दिली आहे.



आजपर्यंत तपासण्यात आलेल्या १ कोटी ९ लाख १५ हजार ६८३ नमुन्यांपैकी १८ लाख २८ हजार ८२६ नमुने पॉझिटिव्ह आले आहेत. सध्या राज्यात ५ लाख ३८ हजार ८४ व्यक्ती होम क्वारंटाइन आहेत. तर ६ हजार २४० व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाइन आहेत. आज घडीला राज्यात ८९ हजार ९८ रुग्ण ॲक्टिव्ह आहेत. आज राज्यात ४ हजार ९३० रुग्णांची नोंद झाली आहे. त्यामुळे राज्यातील एकूण रुग्णांची संख्या आता १८ लाख २८ हजार ८२६ झाली आहे. आज नोंद झालेल्या ९५ मृत्यूंपैकी ३२ मृत्यू हे मागील ४८ तासांमधले आहेत. तर २० मृत्यू हे मागील आठवड्यातले आहेत. उर्वरित ४३ मृत्यू हे एक आठवड्यापूर्वीच्या कालावधीतले आहेत अशीही माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

## साखळी तुटली, तर प्रत्येकाला करोनाची लस देण्याची गरज नाही -आयसीएमआर



### संचालक बलराम भार्गवा यांची महत्त्वाची माहिती

करोनाचा प्रसार रोखण्यासाठी लस महत्त्वाची असल्याची चर्चा कित्येकी महिन्यांपासून सुरू आहे. त्यामुळे सगळ्याचंच लक्ष करोनाची लस कधी येणार, याकडे लागलं आहे. दरम्यान, अखिल भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचे अध्यक्ष बलराज भार्गवा यांनी आज महत्त्वाची माहिती दिली. देशातील करोनाची साखळी तोडण्यात यश आलं, तर प्रत्येक नागरिकाला लस देण्याची गरज पडणार नाही," अशी माहिती भार्गवा यांनी दिली.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाची आज पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेला आयसीएमआरचे अध्यक्ष बलराम भार्गवा आणि केंद्रीय आरोग्य सचिव उपस्थित होते. यावेळी केंद्रीय आरोग्य सचिवांना देशातील सर्व नागरिकांचं लसीकरण करण्यासाठी किती वेळ लागेल याविषयी प्रश्न विचारण्यात आला. त्यावर आरोग्य सचिव म्हणाले,"मी आधी स्पष्ट करतोय की, देशभरात लसीकरण करण्यात येईल, असं सरकारनं कधीही म्हटलेलं नाही. त्यामुळे आपण केवळ वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारावरच अशा वैज्ञानिक विषयांवर चर्चा करायला हवी, हे महत्त्वाचे आहे," असं आरोग्य सचिव म्हणाले.

आरोग्य सचिवांनंतर आयसीएमआरचे भार्गवा यांनी लसीकरणाबद्दल माहिती दिली. ते म्हणाले,"आपले उद्देश करोनाची साखळी तोडण्याचा आहे. त्यामुळे लसीकरण लसीच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असणार आहे. जर आपण गंभीर लोकांचं लसीकरण करण्यास आणि विषाणू प्रसाराची साखळी तोडण्यात यशस्वी ठरलो, तर आपल्याला देशातील संपूर्ण लोकसंख्येला लस देण्याची गरज नाही," असं भार्गवा यांनी यावेळी स्पष्ट केलं. देशात आणि जगभरात करोनाच्या अनेक लशींच्या चाचण्या सुरू असून, पुढील वर्षी सुरूवातीच्या काही महिन्यात लस येण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

## ...तर शेतकऱ्यांनी दुसरीकडे जाऊन मरावं

### आंदोलकांबद्दल केंद्रीय मंत्र्यांचं वादग्रस्त वक्तव्य



नवी दिल्ली : नवे कृषी कायदे रद्द होईपर्यंत संघर्ष सुरूच राहील, अशी ठाम भूमिका दिल्लीच्या वेशीवर ठिय्या देऊन आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी घेतली आहे. सलग सहाव्या दिवशी शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु आहे. प्रामुख्याने पंजाब आणि हरयाणामधील शेतकऱ्यांचा या कृषी कायद्यांना विरोध आहे. पंजाब आणि हरयाणामधील शेतकरी हजारोंच्या संख्येने या आंदोलनामध्ये सहभागी झाले आहेत. मात्र याच आंदोलनासंदर्भात बोलताना हरयाणामधील अंबाला येथे रेल्वे पूलाचे भूमिपुजन करण्यासाठी आलेले केंद्रीय राज्य मंत्री रतनलाल कटारिया यांनी वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. शेतकऱ्यांकडून होणाऱ्या विरोधाला संतापून कटारिया यांनी जर शेतकऱ्यांना विरोधच करायचा आहे आणि काळे झेंडेच दाखवायचे आहेत तर त्यांनी दुसरीकडे जावून मरावं, असं कटारिया यांनी म्हटलं आहे. उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी कटारिया हे कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहचले असता शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवले. शेतकऱ्यांनी मोदी सरकार आणि कटारिया यांच्याविरोधात घोषणाबाजीही केली. शेतकऱ्यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी येऊन विरोध करण्यास सुरुवात केल्यानंतर कटारिया संतापले.

त्यानंतर त्यांनी, आपले अंबालामध्ये सात ते आठ कार्यक्रम आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना विरोधच करायचा असेल तर त्यांनी दुसरीकडे जाऊन मरावे असं वक्तव्य केल्याचं वृत्त न्यूज १८ हिंदीने दिलं आहे. पुढे बोलताना त्यांनी, काळे झेंडे दाखवणाऱ्यांना देव सद्बुद्धि देवो अशी मी हात जोडून प्रार्थना करतो असंही म्हटलं आहे. नवे कृषीकायदे मागे घेतल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही असं आंदोलक शेतकऱ्यांनी सांगितलं. कटारिया हे मागील पाच वर्षांपासून या भागामध्ये आले नव्हते. आज कटारिया येथे आल्यानंतर शेतकऱ्यांनी काळे झेंडे दाखवून त्यांचा विरोध केल्याने ते चांगलेच संतापले.

# अमित शहांची कॉलर पकडायला मागेपुढे पाहणार नाही!

### शेट्टी भडकले

कोल्हापूरः स्वाभिमानी शेतकरी संघटना आंदोलन करत असतानाच पोलिसांनी स्वाभिमानीचे अध्यक्ष व माजी खासदार राजू शेट्टी यांची कॉलर पकडली आणि आंदोलनाला वेगळे वळण लागले. संतप्त कार्यकर्ते पोलिसांच्या अंगावर धावल्याने आंदोलनस्थळी तणावाची परिस्थिती निर्माण झाली. कोल्हापुरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हा प्रकार घडला. दिल्लीत सध्या केंद्र सरकारच्या विरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर दुपारी धडक मोर्चा काढण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने सुरू असतानाच अचानक एका गाडीतून तेथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रतिकात्मक पुतळा आणण्यात आला. या पुतळ्याचे कार्यकर्त्यांनी दहन करू नये यासाठी पोलिसांनी तो हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलीस आणि आंदोलकांत काही प्रमाणात झटापट झाली.पोलीस आणि आंदोलकांत झटापट सुरू असतानाच अचानक एका पोलीस अधिकाऱ्याने माजी खासदार शेट्टी यांच्या कॉलरला हात घातला. त्यांना बाहेर ओढण्याचा प्रयत्न केला. हे पाहताच कार्यकर्ते संतप्त झाले. त्यामुळे आंदोलक पोलिसांच्या अंगावर धावले. यामुळे पोलीस आणि कार्यकर्ते यांच्यातील झटापट आणखी वाढली. काहींनी धक्काबुक्की केली. यातून एकदम तणावाची परिस्थिती निर्माण झाली. संतप्त कार्यकर्ते पोलिसांच्या निषेधाची घोषणा देऊ लागले. यातून गोंधळ सुरू झाला.

राजू शेट्टी यांची कॉलर धरणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने दिलगिरी व्यक्त करावी, अशी मागणी त्यांचे कार्यकर्ते करू लागले. नंतर शेट्टींनी त्यांना शांत केले. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. दरम्यान, यावेळी बोलताना शेट्टी म्हणाले, दिल्लीत शेतकरी आंदोलन करत आहेत.

**(सविस्तर वृत्त पान ५ वर...)**

**उर्मिला मातोंडकरांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश**

## उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत हाती बांधलं शिवबंधन

■ तुषार खानविलकर

मुंबईः बॉलिवूडमधील मराठमोळी अभिनेत्री उर्मिला मातोंडकर यांनी अखेर शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत उर्मिला मातोंडकर यांनी हातावर शिवबंधन बांधत नव्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली आहे. राज्यपाल नियुक्त विधानपरिषदेच्या जागेसाठी शिवसेनेकडून उर्मिला मातोंडकर यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. त्यांची निवड जवळपास निश्चित मानली जात आहे. त्याआधी उर्मिला मातोंडकर यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

विधान परिषदेवरील राज्यपालनियुक्त जागेसाठी शिवसेनेच्या कोटय़ातून उर्मिला मातोंडकर यांचे नाव महाविकास आघाडी सरकारने पाठवलं होतं. उर्मिला मातोंडकर मंगळवारी शिवसेनेत प्रवेश करतील अशी माहिती शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी सोमवारी माध्यमांशी बोलताना दिली होती. त्यानुसार आज दुपारी उर्मिला मातोंडकर मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या निवासस्थानी मातोश्रीवर पोहोचल्या. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह पत्नी रश्मी ठाकरे आणि इतर नेते यावेळी उपस्थित होते. रश्मी ठाकरे यांनी उर्मिला मातोंडकर यांच्या हाती शिवबंधन बांधत पक्षात स्वागत केलं.उर्मिला मातोंडकर दुपारी चार वाजता पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडणार आहेत. उर्मिला मातोंडकर यांनी गेल्या वर्षी काँग्रेस पक्षाच्या वतीने उत्तर मुंबई मतदारसंघातून निवडणूक लढविली होती. परंतु त्यांचा तेव्हा पराभव झाला होता. त्यानंतर त्यांनी काँग्रेस पक्षातील गोंधळावर बोट ठेवत पक्षाचा राजीनामा दिला होता. काँग्रेसच्या राजीनाम्यानंतर त्या राजकारणात सक्रिय नव्हत्या. पण आता शिवसेनेसोबत त्यांनी नव्याने राजकीय वाटचाल सुरु केली आहे.

## योगी आदित्यनाथ आज मुंबईत

**बॉलिवूड उत्तर प्रदेशात नेण्यासाठी पहिली बैठक**

मुंबई : उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ बुधवारी मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. योगी आदित्यनाथ बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमध्ये जाणार आहेत. महत्वाचं म्हणजे यावेळी योगी आदित्यनाथ काही बॉलिवूड सेलिब्रेटी आणि उद्योजकांशी उत्तर प्रदेशात गुंतवणूक करण्यासंबंधी चर्चा करणार आहेत. १ डिसेंबरच्या रात्री योगी आदित्यनाथ लखनऊहून मुंबईसाठी रवाना होतील. २ डिसेंबरला बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचा कार्यक्रम संपल्यानंतर योगी आदित्यनाथ उद्योजक आणि बॉलिवूड सेलिब्रेटींना उत्तर प्रदेशात गुंतवणुकीसाठी आमंत्रित करतील. या बैठकीत दिग्दर्शक सुभाष घई, बोनी कपूर, टी सीरिजचे भूषण कुमार, झी स्टुडिओचे जतीन सेठी, नीरज पाठक, रणदीप हुडा, तिगमांशू धुलिया, जिमी शेरगिल, तरण आदर्श, कोमल नाहता आणि राजकुमार संतोषी उपस्थित राहतील अशी माहिती अधिकाऱ्याने फ्री प्रेस जर्नलला दिली आहे.

सप्टेंबर महिन्यात योगी आदित्यनाथ यांनी एका नव्या फिल्म सिटीची घोषणा केली होती. देशाला एका चांगल्या फिल्म सिटीची गरज असून आम्ही उत्तर प्रदेशमध्ये एका भव्य फिल्म सिटीची निर्मिती करणार असल्याचं ते म्हणाले होते. अनेक सेलिब्रेटींनी योगी आदित्यनाथ यांच्या निर्णयाचं स्वागत केलं होतं. योगी आदित्यनाथ यांनी यासंबंधी लखनऊतही बैठक घेतली होती. योगी आदित्यनाथ यांनी फिल्मसिटी उभारण्यासाठी नोएडा जवळील यमुना एक्स्प्रेसवेवर असणारी १००० एकर जागाही राखून ठेवली आहे. ही फिल्मसिटी बॉलिवूडपेक्षाही मोठी असेल असं योगी आदित्यनाथ यांचं म्हणणं आहे.

**चंदा कोचर यांना मोठा धक्का**

# सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयानेचंदा कोचर (Chanda Kochar) यांना मोठा धक्का दिला आहे. मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या बडतर्फ करण्याच्या आदेशात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे. दरम्यान, गेल्यावर्षी चंदा कोचर यांनी आयसीआयसीआय बँकेच्या सीईओ पदावरून हटवण्यात आल्यानंतर या निर्णयाविरोधात याचिका दाखल केली होती. ही याचिका न्यायलयाने फेटाळली आहे. 'आम्ही उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करण्यास इच्छूक नाही आहोत. हा बँक आणि नियोक्त्यादरम्यानचा खाजगी करार आहे', असे सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे.

आयसीआयसीआय बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक पदावरून हटवण्याविरोधात चंदा कोचर यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर्षी मार्चमध्ये मुंबई उच्च न्यायालयाने ती याचिका फेटाळली होती. त्यानंतर चंदा कोचर यांनी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. मात्र, उच्च न्यायालयाने देखील चंदा कोचर यांची याचिका फेटाळली आहे.

**याआधी मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली होती याचिका**




### 30 नोव्हेंबर 2019 रोजी दाखल केली होती याचिका

नोकरीवरून काढून टाकण्याच्या निर्णयाला आव्हान देत चंदा कोचर यांनी 30 नोव्हेंबर 2019 रोजी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. चंदा कोचर यांचे वकील विक्रम नानकानी यांनी असा युक्तिवाद केला की 5 ऑक्टोबर 2018 रोजी बँकेने कोचर यांचा राजीनामा स्वीकारला.दरम्यान, गेल्या वर्षी जानेवारीत आयसीआयसीआय बँकेच्या संचालक मंडळाने निर्णय घेतला की चंदा कोचर यांचे बँकेपासून वेगळे होणे 'टर्मिनेशन फॉर कॉज' (Termination for Cause) मानले जाईल. म्हणजेच त्यांना काही कारणास्तव काढून टाकण्यात आले आहे.

याशिवाय, त्यांना मिळणारे सर्व फायदे बंद केले जातील, जसे की, बोनस, इंक्रीमेंट (पगार वाढ) किंवा वैद्यकीय लाभ असला तरी त्यांना कोणत्याही प्रकारचा कोणताही लाभ दिला जाणार नाही.चंदा कोचर यांना एप्रिल 2009 पासून मार्च 2018 पर्यंच जितका बोनस देण्यात आला आहे, तो देखील वसूल केला जाईल. या प्रकरणातील चौकशी अहवालात असे म्हटले आहे की, चंदा कोचर यांनी वार्षिक घोषणा अर्थात annual disclosures सांगताना इमानदारीने हे काम केले नाही आहे. जे की बँकेचे अंतर्गत धोरण, कोड ऑफ कंडक्ट आणि भारतीय कायद्यानुसार ते आवश्यक आहे.

### बोनसची होणार वसूली

**मार्च 2018 मध्ये चंदा कोचर यांच्यावर आपल्या पतीला आर्थिक लाभ घेण्यासाठी आपल्या पदाचा गैरवापर केल्याचा आरोप होता. मीडिया रिपोर्टनुसार आयसीआयसीआय बँकेने व्हिडिओकॉन ग्रुपला 3,250 कोटी रुपयांचे कर्ज दिले होते. व्हिडिओकॉन समूहाने या कर्जाचे 86 टक्के (सुमारे 2810 कोटी रुपये) परतफेड केलेले नाहीत. 2017 मध्ये हे कर्ज एनपीए (नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स) मध्ये ठेवले गेले.**




### फाईव्ह स्टार :

## स्वच्छ मुंबईसाठी महापालिकेचा आटापिटा

मुंबई : महापालिकेने गेल्या वर्षी स्वच्छतेसाठी पायाभूत सुविधा, माहिती-शिक्षण-संवाद अंतर्गत उपक्रम, क्षमता बांधणी असे काम केले आहे. परिणामी घरोघरी कचरा संकलन, कचरा वर्गीकरण, कचरा निर्माण करणा-या संस्थांतर्फे कच-याची जागेवर विल्हेवाट, प्लास्टिक बंदी, कच-यावर शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट असे बदल दिसून आले. परिणामी आता स्वच्छ भारत अभियान अंतर्गत असलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी महापालिका आटापिटा करत आहे.

मुंबई महापालिकेने कचरामुक्त तारांकित शहर मध्ये मुंबईला पंचतारांकित (५ स्टार) साठी नागरिकांचे आक्षेप व अभिप्राय मागविले आहेत. १४ डिसेंबर किंवा त्यापूर्वी हे कळविण्यात यावे, असे आवाहन केले आहे. स्वच्छतेची चांगली पातळी गाठण्यासाठी केंद्राने कचरामुक्त तारांकित शहरचे निकष ठरविले आहेत. शहरांना प्रगतिशील सुधारणांसह स्वच्छतेच्या ७ स्टारचे ध्येय गाठता येतील, अशा प्रकारे हे निकष आहेत. दरम्यान, हगणदारीमुक्त मुंबईसाठी नागरिकांनी आक्षेप अथवा सूचना असल्यास त्यांनी १४ डिसेंबर २०२० रोजी किंवा त्यापूर्वी कळवाव्यात, असे आवाहन महापालिकेने केले आहे. शौचालयाची योग्य ती स्थिती आणि देखभाल ठेऊन हगणदारीमुक्तचे ध्येय गाठता येतील, अशा प्रकारचे हे निकष आहेत.

# उपऱ्यांसाठी घाई, आदिवासींसाठी दिरंगाई

**मोबदला वाटपातही दुजाभाव : महिनाभरात केवळ सहा आदिवासींना धनादेश**

मुंबई-बडोदा महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या नियमबाह्य व्यवहारांना परवानगी देऊन दलाल आणि तथाकथित विकासकांना 'लाभार्थी' बनवणाऱ्या पनवेल प्रांत कार्यालयाने नुकसानभरपाई वाटपातही पक्षपात केल्याचा आरोप होत आहे. पनवेल तालुक्यांतील चार गावांतील ७० लाभार्थीपैकी १५ 'विशेष' लाभार्थींना ऑक्टोबरमध्ये मोबदल्याचे धनादेश देण्यात आले. मात्र, त्यानंतर महिनाभरात उरलेल्या ५५ जणांपैकी अवघ्या सहा लाभार्थीना मोबदल्याचे वाटप झाले. टाळेबंदीत वेगाने हालचाली करून ठरावीक लाभार्थीची धन करणाऱ्या जिल्हा प्रशासनाने इतरांच्या बाबतीत दिरंगाई का केली, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

मुंबई-बडोदा राष्ट्रीय महामार्गातील २० किमी अंतराचा टप्पा पनवेल तालुक्यातून गेला आहे. त्यासाठी या पट्ट्यातील शिरवली, आंबेततर्फे तळोजे, वांगणीतर्फे तळोजे आणि मोर्बे या चार गावांतील जमीन संपादित करण्यात आली आहे. या भूसंपादनाची अधिसूचना निघाल्यानंतरही करण्यात आलेल्या जमीन व्यवहारांबाबत संशयाचे धुके निर्माण झाले असताना, नुकसानभरपाई वाटपाच्या प्रक्रियेतही दुजाभाव होत असल्याचा आरोप होत आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनाच्या नुकसानभरपाईचे एकूण ७० लाभार्थी आहेत. त्यापैकी १५ लाभार्थींना ऑक्टोबर महिन्यात धनादेश देण्यात आले. त्यामध्ये एका लाभार्थी कुटुंबाला २२ कोटी इतकी नुकसानभरपाई



देण्यात आली. तर अगदी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये झालेल्या व्यवहारांतील लाभार्थीनाही मोबदल्याचे वाटप करण्यात आले. मात्र, उरलेल्या ५५ लाभार्थ्यांपैकी सहा जणांनाच आतापर्यंत भरपाईचे धनादेश मिळू शकले आहेत.

यासंदर्भात पनवेलचे प्रांताधिकारी दत्तू नवले यांच्याकडे विचारणा केली असता, 'सर्व खातेधारकांचे नुकसानभरपाईचे धनादेश तयार आहेत व त्यांना भरपाई घेऊन जाण्यास सांगितले आहे. मात्र, वैयक्तिक वादात अनेक खातेधारक असल्याने त्यांच्यासाठी जाहीर नोटीस प्रक्रिया राबवली आहे,' असे उत्तर त्यांनी दिले. यासंदर्भातील अधिक माहिती व आकडेवारी विचारली असता, 'आज (सोमवारी) गुरुनानक जयंतीनिमित्त सुट्टी असल्याने ही माहिती उद्या देता येईल,' असेही त्यांनी स्पष्ट केले. शासनाचे भूसंपादन प्रक्रियेतील सर्व नियम पाळूनच हे व्यवहार पारदर्शकपद्धतीने पार पडले आहेत. निवाडा जाहीर झाल्यावर कोणत्याही खातेधारकाचे नाव चढविण्यात आले नाही, याचा पुनरुच्चारही नवले यांनी केला. मुंबई अहमदाबाद रस्त्याच्या भूसंपादनात स्थानिकांना डावलून बाहेरील व्यक्तींना जमिनीचा मोबदला अदा केल्याची तक्रार नोंद झाल्याचे समजले आहे. या संदर्भात प्रांत अधिकाऱ्यांकडून वस्तुस्थितीची माहिती घेऊन याबाबत कोणावरही अन्याय झाला असल्यास याप्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे.

## रखडलेल्या ८७ हजार घरांच्या बांधकामाला चालना



मुंबई : कोरोना संक्रमण आणि बांधकाम व्यावसायिकांच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे रखडलेल्या प्रकल्पांना केंद्र सरकारने स्पेशल विंडो फॉंर अफोर्डेबल अँण्ड मिड इनकम हाऊसिंग फंडातून (स्वामी) अर्थसहाय्य देण्यास सुरूवात केली आहे. १३६ प्रकल्पांना कर्ज मंजूर झाले असून त्यापैकी ३६ ठिकाणी कर्ज वितरणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे सुमारे ८७ हजार रखडलेल्या घरांचे बांधकाम सुरू झाले असून त्यात गुंतवणूक करणा-यांना मोठा दिलासा मिळणार आहे.मध्यम आकाराच्या आणि परवडणा-या घरांच्या प्रकल्पांमध्ये जर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या असतील तर त्या दूर करण्यासाठी नोव्हेंबर, २०१९ मध्ये केंद्र सरकारने स्वामी फंड उभारण्यास मान्यता दिली होती. कोरोना संकट काळात हा निधी अंतिम टप्प्यात रखडलेल्या काही प्रकल्पांसाठी वरदान ठरला आहे. पहिल्या टप्प्यात किमान २५ हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर होईल अशी अपेक्षा आहे. त्यापैकी सुमारे १३ हजार कोटी रुपयांच्या अर्थसहाय्याला मंजूरी देण्यात आली आहे. अर्थसहाय्यासाठी ३५० पेक्षा जास्त प्रकल्पांचे अर्ज सरकारकडे दाखल झाले आहेत. मंजूरी मिळालेल्यांपैकी ३६ प्रकल्पांसाठी प्रत्यक्ष निधी उपलब्ध झाला असून त्यांचे काम सुरू झाल्याची माहिती हाती आली आहे. सर्वाधिक प्रकल्प महाराष्ट्रात आहेत. मुंबईतील चार आणि ठाणे पुण्यातील प्रत्येकी एक प्रकल्पाचा समावेश आहे.

बोरिवली येथील सीसीआय प्रकल्पाचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून रखडले असून हवालदिल झालेल्या गुंतवणुकदारांच्या तक्रारी आणि परताव्याची मागणी करणा-या याचिका महारेराकडे दाखल होत आहेत. या प्रकल्पाचे सुमारे ९५ टक्के काम पूर्ण झाले असून केंद्र सरकारच्या अर्थसहाय्यामुळे रखडलेले उर्वरित काम येत्या काही महिन्यांत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. याच धर्तीवर अन्य प्रकल्पसुध्दा मार्गी लागतील आणि तिथे गुंतवणूक करणा-या कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार होईल अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## ठाण्याच्या 'मामलेदार मिसळ'चे मालक लक्ष्मण मुर्डेश्वर यांचं निधन

ठाणे :महाराष्ट्राचे मिसळसम्राट अशी ख्याती असलेले आणि ठाण्याच्या मामलेदार मिसळचे मालक लक्ष्मणमामा मुर्डेश्वर यांचं आज निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. अल्पशा आजारामुळे त्यांच्यावर गेल्या १५ दिवसांपासून उपचार सुरु होते. मामलेदार मिसळ हा ब्रांड निर्माण करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. ठाण्याच्या तहसील कार्यालयाबाहेरील 'मामलेदार मिसळ' हा आज एक ब्रँड झाला आहे. मात्र या ब्रँडची मुहूर्तमेढ ठाण्यात १९४६ साली रोवली गेली. या मिसळीने यंदा सत्तरी गाठली आहे, मात्र तिची लोकप्रियता तसूभरही कमी झालेली नाही.

लक्ष्मणमामा लहान असताना त्यांचे वडील नरसिंह मुर्डेश्वर हे ठाण्यात आले. त्यावेळी लक्ष्मणमामा ४ वर्षांचे होते. त्यांचे मूळ गाव कर्नाटकातील मुर्डेश्वर. ठाण्यात आल्यानंतर त्यांच्या वडिलांनी




उद्योग करावा, या हेतूने आजचे तहसीलदार कार्यालय, म्हणजे त्यावेळच्या मामलेदार कचेरीच्या बाहेरची जागा शासनाकडून भाडे तत्त्वावर घेतली आणि तिथे कँटीन सुरू केलं. मात्र त्यानंतर काही वर्षांनी म्हणजे १९५२ साली त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे व्यवसायाची जबाबदारी लक्ष्मण मुरडेश्वर यांच्यावर आली. तेव्हापासून समर्थपणे मिसळीचा हा व्यवसाय ते सांभाळत होते. त्यांच्या मिसळीच्या अनेक शाखा मुंबई, बोरिवली, डोंबिवलीत सुरु झाल्या आहेत.

खाकी रंगाच्या डिशमध्ये लालभडक तरीसोबत असलेली मिसळ, त्यावर पेरलेला कांदा, फरसाण आणि शेजारी काचेच्या बशीत दोन पाव. हे पाहून अस्सल खवय्यांना मिसळ खावीशी वाटली नाही तरच नवल. सर्वात तिखट मिसळ अशी या मिसळीची ख्याती आहे. मामलेदार मिसळ तीन प्रकारांमध्ये मिळते. कमी तिखट, मध्यम तिखट आणि खूप तिखट. यातली खूप तिखट मिसळ खाणं हे साध्यासुध्या माणसाचं काम नाही. पट्टीचा तिखट खाणाराच तिथे पाहिजे.

ठाणे स्टेशनजवळ असलेल्या जिल्हा परिषद कार्यालयावर एका छोट्याश्या कँटिनमध्ये या मिसळीचा प्रवास सुरु झाला. ५० स्क्वेअर फुटांवरुन इथलं कँटिन ५०० स्क्वेअर फुटांपेक्षा जास्त मोठ्या जागेत गेलं. मात्र या मिसळीची चव किंचितही बदलली नाही. इथे मिसळ खायला बसल्यावर तुमच्यासमोर पाण्याचे भरपूर ग्लास ठेवले जातात. नवख्या लोकांना एवढे ग्लास का ठेवले जात असतील हा प्रश्न पडतोच. मात्र मिसळीचा पहिला घास खाल्यानंतर कळतं की एवढं पाणी का आणून ठेवलं आहे. मामलेदार मिसळ सुरु करणाऱ्या नरसिंह मुर्डेश्वर यांच्या पत्नीने या मिसळीसाठीचा मसाला सर्वात आधी तयार केला होता. आजही त्याच पद्धतीचा मसाला वापरुन ही मिसळ तयार केली जाते. त्यामुळे मिसळीच्या चवीत थोडासाही फरक पडलेला नाही.

## नितीन नांदगावकर यांच्या नावावर दीड लाख रुपये उकळणाऱ्या दोघांना अटक

मुंबई : शिवसेनेचे नेते नितीन नांदगावकर यांच्या नावावर दीड लाख रुपये उकळणाऱ्या दोघांना अंधेरी पूर्व एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे. यातील सूरज निकम या आरोपीस सातारामधून, तर रोहित कांबळे याला मुंबतूनच अटक केली गेली आहे. एका बांधकाम व्यावसायिकाने घेतलेले पैसे मिळवून देतो, असे सांगून हे पैसे घेण्यात आले असल्याचे तक्रारदाराने पोलिसांना सांगितले आहे. नालासोपारा या ठिकाणी विकी सिद्दिकी नावाचा बांधकाम व्यावसायिक आहे. त्याच्याकडून घर घेण्यासाठी तक्रारदार संदीप यांनी त्याला १८ लाख रुपये दिले होते. मात्र, पैसे घेतल्यानंतर बिल्डर सिद्दिकी यांनी संदीप यांना घर दिले नव्हते, म्हणून संदीप यांनी नितीन नांदगावकर यांच्याकडे मदत मागितली होती. विशेष म्हणजे यासाठी त्यांनी नितीन नांदगावकर यांच्या फेसबुक फॅन पेजवर आपला नंबरही दिला होता. आरोपींनी




फेसबुक फॅन पेजवरून संदीप यांचा नंबर घेऊन त्यांच्याशी संपर्क साधला. यानंतर आपण नितीन नांदगावकर यांच्या कार्यालयातून बोलत असल्याचे सांगितले गेले व तुम्हाला मदत करू पण यासाठी काही पैसे द्यावे लागतील, असे सांगण्यात आले.बोलण्यावर विश्वास ठेवून संदीप यांनी त्यांना दीड लाख रुपये पाठवले. मात्र, यानंतर आरोपींनी फोन बंद केला. संदीप यांना आपली फसवणूक झाल्याचे समजताच त्यांनी पोलिसांत धाव घेतली. अंधेरी पूर्व एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात तक्रार दाखल केली. यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून दोन्ही आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणावरून अटक केली.

## ऑनलाइन करभरण्यावर ठाणेकरांचा भर

ठाणे : रोकडरहित व्यवहार करण्याचे आवाहन केंद्र शासनाकडून गेल्या काही वर्षांपासून सातत्याने केले जात असले तरी, त्यास मात्र हवा तसा प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र होते. मात्र, करोनाकाळात नागरिकांनी रोकडरहित व्यवहार करण्यावर भर दिला असून महापालिकेच्या तिजोरीत आतापर्यंत जमा झालेल्या मालमत्ता करापैकी ३१ टक्के कर ऑनलाइनद्वारे जमा झाला आहे. गेल्या वर्षी ऑनलाइनद्वारे करभरणा करण्याचे प्रमाण १६ टक्क्यांच्या आसपास होते.

ठाणे शहरातील करोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्याबरोबरच महापालिका प्रशासनाने करवसुलीवर गेल्या काही महिन्यांपासून भर दिला आहे. ठाणे शहरातील ५ लाख २ हजार करदात्यांना महापालिकेने मालमत्ता कराची देयके दिली आहेत. त्यापैकी २ लाख २६




हजार करदात्यांनी ३२२ कोटी रुपयांचा कर जमा केला आहे. मागील वर्षी याच कालावधीत ३५० कोटींची वसुली झाली होती. करोनाचा काळ असतानाही त्यात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. महापालिकेने प्रभाग समिती तसेच मुख्यालयात मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याशिवाय, डीजी ठाणे अॅप आणि महापालिकेच्या संकेतस्थळाद्वारे ऑनलॉइन कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

### महापालिकेच्या तिजोरीत ऑनलाइनद्वारे ३१ टक्के महसूल जमा

शहरातील नागरिकांनी मात्र करोनाच्या भीतीपोटी पालिका कार्यालयांमध्ये जाऊन कर भरण्याऐवजी ऑनलाइन कर भरणा करण्यावर भर दिला आहे. महापालिकेच्या तिजोरीत आतापर्यंत ३२२ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला असून त्यापैकी ९७ कोटी ६२ लाखांचा कर ऑनलाइनद्वारे भरला आहे. सुमारे ९० हजार करदात्यांनी ऑनलाइनद्वारे कर भरला असून ऑनलाइन करभरणा करण्याचे प्रमाण ३१ टक्के आहे. गेल्यावर्षी ऑनलाइनद्वारे करभरणा करण्याचे प्रमाण १६ टक्के होते. त्यामुळे ऑनलाइन करभरणा करण्याचे प्रमाण यंदा दुपटीने वाढल्याचे चित्र आहे. संपूर्ण ठाणे शहरात ९० हजार नागरिकांनी ऑनलाइन मालमत्ता कर भरला असून त्यामध्ये नौपाडा, कोपरी आणि वर्तकनगर परिसरातील करदात्यांची संख्या सर्वाधिक आहे. वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रात १८.९२ टक्के तर नौपाडा- कोपरी प्रभाग समिती क्षेत्रात १६.९० टक्के करदात्यांनी ऑनलाइनद्वारे कर भरला आहे. याशिवाय २१ संकलन केंद्रावर एटीएम, डेबिट, क्रेडिट कार्डद्वारेही मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

## कार्यक्रम स्वरूपानुसार उपस्थितांची संख्यामर्यादा हवी-उच्च न्यायालय

मुंबई : करोनाच्या पाश्र्वभूमीवर लग्नसोहळे आणि अंत्यसंस्कारात किती लोकांनी सहभागी व्हावे याबाबत घालून दिलेली संख्यामर्यादा ही अन्य कार्यक्रमांसाठी सरसकट लागू केली जाऊ शकत नाही. उलट कार्यक्रम स्वरूप, कार्यक्रमस्थळाची क्षमता लक्षात घेऊन त्यानुसार लोकांना छोटय़ा-मोठय़ा कार्यक्रमांत सहभागी होण्यास परवानगी देणे योग्य होईल, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

लग्नसमारंभ आणि अंत्यसंस्काराप्रमाणेच अन्य छोटय़ा व मोठय़ा कार्यकमांत सहभागी होणाऱ्यांसाठीची संख्यामर्यादा निश्चित करावी, अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली होती. त्यावरील सुनावणीच्या वेळी



न्यायमूर्ती सुनील शुक्रे आणि न्यायमूर्ती अविनाश घारोटे यांच्या खंडपीठाने या दोन्ही कार्यक्रमांचा नियम अन्य कार्यक्रमांना सरसकट लागू करता येऊ शकत नसल्याचे स्पष्ट केले. करोनाच्या पाश्र्वभूमीवर लग्नसमारंभांत ५०, तर अंत्यसंस्कारात २० व्यक्ती सहभागी होण्यास परवानगी आहे.

सरकारच्या अधिसूचनांमध्ये मोठय़ा सार्वजनिक कार्यक्रमाची व्याख्या वा त्यात सहभागी होणाऱ्या व्यक्तींची कमाल संख्या नमूद नाही. अधिसूचनेत केवळ लग्नसोहळे आणि अंत्यसंस्काराबाबत नमूद असून त्यात किती व्यक्ती सहभाही होऊ शकतात याची मर्यादा निश्चित केली आहे. या दोन्ही कार्यक्रमांचे स्वरूप वेगळे आहे. त्यामुळे त्यांची मर्यादा ती अन्य मोठय़ा कार्यक्रमांसाठी लागू होऊ शकत नाही, असे आम्हाला वाटत असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

## अपघातानंतर दुचाकीस्वाराचे पलायन

ठाणे : मोटारसायकलच्या धडकेत पायी रस्ता ओलांडणारे आजोबा शंकर चंद्रा सिंग (६८) हे गंभीर जखमी झाल्याची घटना एसजीएस कंपनीसमोरील रोड क्रमांक १६ येथे २६ नोव्हेंबर रोजी रात्री ७ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी अज्ञात मोटारसायकल स्वाराविरुद्ध श्रीनगर पोलीस ठाण्यात रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वागळे इस्टेट, शिवशक्तीनगर येथील पाईपलाईन जवळ राहणारे शेखर सिंग यांचे आजोबा शंकर सिंग हे वागळे इस्टेट रोड क्रमांक १६ हा रस्ता २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास ओलांडत होते. त्याचवेळी भरघाव वेगाने आलेल्या एका अज्ञात दुचाकीस्वाराने त्यांना धडक दिली. या अपघातामध्ये त्यांच्या उजव्या पायाच्या घुटन्याजवळ फ्रॅक्चर झाले. तसेच कमरेच्या डाव्या बाजूला मार लागून ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर मोटारसायकल स्वाराने शंकर सिंग यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल न करता तिथून पलायन केले.

## 'तिसऱ्या डोळ्या'कडे डोळेझाक

### ठाण्यातील निम्मे सीसीटीव्ही कॅमेरे बंदच ; महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

ठाणे : महापालिका क्षेत्रातील रस्त्यावरील गुन्हेगारीला पायबंद बसावा तसेच शहरातील कायदा-सुव्यवस्थेवर लक्ष राहावे, या उद्देशातून प्रशासनाने काही वर्षांपूर्वी मोठा गाजावाजा करत शहरात १४०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर बसविण्यात आलेले हे कॅमेरे सातत्याने बंद पडत असल्याचा आरोप होत असतानाच आता ठाणे शहरातील ५० टक्के, तर मुंब्रा, दिवा परिसरातील शंभर टक्के कॅमेरे बंद असल्याचा आरोप राष्ट्रवादीने केला आहे. त्यामुळे ही योजना पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडण्याबरोबरच शहराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गुन्हेगारीला आळा बसण्यासाठी आणि गुन्हेगार लवकरात लवकर



सापडण्यासाठी शहरात सीसीटीव्ही बसवण्यात आले. सीसीटीव्हींना 'तिसरा डोळा' समजले जाते. ठाणे शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर प्रभाग सुधारणा निधीतून १२००, वायफाय योजनेतून १०० असे एकूण १३०० कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तसेच महापालिका प्रशासनाने यापूर्वी शहरात शंभर कॅमेरे बसविले आहेत. याशिवाय, तीनशे ते चारशे कॅमेरे आणखी बसविण्यात येणार होते. या कॅमेऱ्यांमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर लक्ष ठेवणे पोलिसांना शक्य होणार असून त्याचबरोबर सोनसाखळी चोरी आणि रस्त्यावरील गुन्हेगारीला आळा बसेल, असा दावा पालिका प्रशासनाने केला होता. मात्र, गेल्या काही वर्षांपासून कॅमेरे बंद पडत असल्याने ही योजना वादाच्या भोवऱ्यात सापडत आहे. शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याची बाब गेल्या वर्षी सर्वसाधारण सभेत उघडकीस आली होती. नौपाडा पोलिसांनी एका गुन्ह्याच्या तपासासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रीकरण मिळविण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाकडे पत्रव्यवहार केला होता. त्या वेळेस चरई, हरिनिवास सर्कल, ब्राह्मण सोसायटी, दगडी शाळा सर्कल, चरई, गोखले रोड, अहिल्याबाई होळकर मैदान, मूस चौक, प्रभाग क्रमांक १९, २०, २१ येथील कॅमेरे बंद असल्याचे समोर आले होते. ही बाब सर्वसाधारण सभेत उघड झाल्यानंतर नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले होते. असे असतानाच वर्षभरानंतर ठाणे शहरातील ५० टक्के, तर मुंब्रा परिसरातील शंभर टक्के कॅमेरे बंद असल्याची बाब समोर आली आहे.

**बंद कॅमेऱ्यांप्रकरणी राष्ट्रवादीचे आंदोलन**

ठाणे शहरातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक तर मुंब्रा-कौसा आणि दिव्यातील १०० टक्के सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. या संदर्भात ठामपाच्या विद्युत विभागाशी संपर्क साधूनही कार्यवाही होत नसल्याचा आरोप मुंब्र्यातील राष्ट्रवादीचे नगरसेवक अश्रफ (शानू) पठाण यांनी केला आहे. त्यांनी सोमवारी सीसीटीव्ही लावलेल्या खांबांवर चढून तिथे एक फलक लावून अनोखे आंदोलन केले.

# ठाणेकरांच्या हक्काचे ९६ कोटी तत्कालीन पालिका आयुक्तांनी बुडवले

## मनसेचा आरोप



ठाणे : शहरातील मोक्याची तब्बल ७५ हजार ३९० चौ. मी. जागा मेट्रो ठेकेदाराच्या घशात फुकट घालणाऱ्या ठाणे महापालिकेचे तत्कालिन आयुक्त संजीव जयस्वाल यांची एसीबीमार्फत चौकशी करण्याची मागणी मनसेकडून करण्यात आली आहे. या जागेचे ९६ कोटी रुपयांच्या भाड्यापोटी दमडीही हा ठेकेदार पालिका प्रशासनाला तीन वर्षांपासून देत नसून मेट्रो चारच्या कामासाठी ही जागा त्याला प्रशासनाने आंदणच दिली आहे. त्यामुळे या प्रकरणातील आर्थिक व्यव्हारावर संशयाची सुई दाखवत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी मनसेने केली आहे.

वडाळा - ठाणे - कासारवडवली या मेट्रो चारच्या प्रकल्पासाठी ठाण्याचे तत्कालीन आयुक्त संजीव जयस्वाल यांनी महापालिकेच्या मालकीची 75 हजार 360 चौ.मी. जागा संबंधित ठेकेदाराला विनामूल्य दिली होती. याठिकाणी ठेकेदाराला लेबर कॅम्प, आर.एम.सी. प्लॉट, कास्टींग यार्ड आदी वापरासाठी जागा कोणतेही शुल्क न आकारता देण्यात आली. या जागेच्या वापराबद्दल पालिका प्रशासनाला चांगले उत्पन्न मिळू शकले असते परंतु तत्कालीन आयुक्त जयस्वाल यांनी कोणत्या हेतूने मोफत जागा

# मीरा भाईंदर महापालिकेने नैसर्गिक खाड्यांना ठरवले नाले

मीरारोड - मीरा भाईंदर महापालिकेने नैसर्गिक खाडयांना आणि खाडी पात्र परिसरास चक्क नाले ठरवून काँक्रीटचे पक्के नाले बांधकाम करण्यासाठी एमसीझेडएमए कडे मंजुऱ्या मिळवण्याचा घाट घातला आहे . तर एमसीझेडएमए आणि कांदळवन सेलने देखील खाड्याना नाले ठरवत अटीशर्तीवर प्राथमिक परवानग्या दिल्या आहेत . त्यामुळे पर्यावरणाचे रक्षणकर्तेच पर्यावरणाच्या मुळावर उठल्याने ह्या सर्वांना निलंबित करून गुन्हे दाखल करण्याची मागणी वनशक्तीचे स्टॅलिन दयानंद यांनी केली आहे .

मीरा भाईंदर महापालिकेतील अधिकारी , लोकप्रतिनिधी , ठेकेदार आदींवर पर्यावरणाचा ऱ्हास केल्याचे अनेक गुन्हे शहरातील विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत . तर अनेक तक्रारी गुन्हे



दाखल होण्यासाठी प्रलंबित आहेत . तसे असून देखील महापालिका मात्र पर्यावरणाचा ऱ्हास करण्यात आघाडीवर आहे .

महापालिकेने शहरातील मलमूत्र व सांडपाणी बेकायदेशीरपणे थेट खाडी आणि कांदळवनात सोडलेले असताना प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी आधीच पालिकेच्या ह्या जलप्रदूषणास अभय देत आले आहेत . खाडी व खाडी पात्रात कांदळवणाची तोड करून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर भरीव करून अनधिकृत बांधकामे उभी रहात आहेत . त्यावर कोणतीच यंत्रणा कारवाईस तयार नाही . तर पालिकेवणे खाड्याना चक्क नाले ठरवून त्यासाठी कांदळवन सेल आणि एमसीझेडए मार्फत नाले बांधकामासाठी मंजुऱ्या सुद्धा मिळवण्याचा प्रकार चालवला आहे.

पालिकेने उत्तन नका ते पाली पर्यंतची नैसर्गिक नवीखाडी हि चक्क नाला म्हणून नमूद केली आहे . वास्तविक सदर खाडी हि समुद्राला मिळणारी असून या ठिकाणी खाडीपात्रात दाट कांदळवन आहे . ह्या खाडी पात्रात पालिकेने बेकायदेशीर सांडपाणी सोडले असून पालिकेच्या आशीर्वादाने येथे कांदळवन तोडून भराव व बांधकामे झाली आहेत . खाडी चा नाला सांगून या ठिकाणी काँक्रीटच्या भिंती उभारून पक्का नाला करण्याचा प्रस्ताव पालिकेने एमसीझेडएमए कडे दिला आहे .

मीरारोडच्या कनकिया येथील संत थॉमस शाळा ते खाडी पर्यंतचा नाला पालिकेने मंजुरीसाठी एमसीझेडएमए कडे दिला होता . वास्तविक ह्या ठिकाणी पूर्वीपासून कांदळवन होते आणि ते नष्ट केल्या प्रकरणी गुन्हे दाखल आहेत.

# पालिका रुग्णालयाची दुरवस्था



कल्याणमधील रुक्मिणीबाई रुग्णालयातील कंत्राटी कामगार संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

कल्याण : कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयाच्या वास्तूची दुरवस्था झाली आहे. रुग्ण उपचार घेत असलेल्या खोल्यांमधील छताचा गिलावा जमिनीवर कोसळत आहे. पावसाचे पाणी झिरपल्याने अनेक ठिकाणी भिंतीं ओल्या झाल्या आहेत. या सर्वांचा त्रास रुग्ण, परिचारिका, वैद्यकीय अधिकाऱ्यांना होत आहे. याप्रकरणी लक्ष घालण्याची मागणी कंत्राटी कामगार संघटनेचे अध्यक्ष कोणार्क देसाई यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे. दरम्यान, करोनाकाळात यंत्रणा व्यस्त असल्याने रुग्णालय दुरुस्तीचे काम थांबले होते. मात्र, आता हे काम पुन्हा सुरू झाले आहे, असा दावा रुग्णालय प्रशासनाने केला आहे.

रुक्मिणीबाई रुग्णालय परिसरात अस्वच्छता असते. पावसाच्या पाण्यामुळे रुग्णालयातील अनेक खोल्यांच्या छतांना ओलावा आला असून त्यामुळे प्लॅस्टर अचानकपणे जमिनीवर पडत आहे. हा गिलावा रुग्णाच्या अंगावर पडून त्यांना इजा होण्याची भीती आहे. तसेच या छताचा तुकडा अंगावर पडेल, अशी भीती डॉक्टर आणि परिचारिका यांनी व्यक्त केली आहे.पालिकेचा अर्थसंकल्प २१०० कोटींचा असताना प्रशासनाला रुक्मिणीबाई रुग्णालय सुसज्ज करता आलेले नाही.

# ठाणेकरांच्या हक्काचे ९६ कोटी तत्कालीन पालिका आयुक्तांनी बुडवले

ठाणे : शहरातील मोक्याची तब्बल ७५ हजार ३९० चौ. मी. जागा मेट्रो ठेकेदाराच्या घशात फुकट घालणाऱ्या ठाणे महापालिकेचे तत्कालिन आयुक्त संजीव जयस्वाल यांची एसीबीमार्फत चौकशी करण्याची मागणी मनसेकडून करण्यात आली आहे. या जागेचे ९६ कोटी रुपयांच्या भाड्यापोटी दमडीही हा ठेकेदार पालिका प्रशासनाला तीन वर्षांपासून देत नसून मेट्रो चारच्या कामासाठी ही जागा त्याला प्रशासनाने आंदणच दिली आहे. त्यामुळे या प्रकरणातील आर्थिक व्यव्हारावर संशयाची सुई दाखवत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी मनसेने केली आहे.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई**
धर्मादाय आयुक्त भवन, २रा मजला, ८३,
डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८.

**चौकशीची जाहीर नोटीस**

**अर्ज क्र. - ACC/X/1129/2020**
**सार्वजनिक न्यासाचे नांव - Golden Heart Charitable Trust बाबत**
**Mr. Mohd Faizan Abdul Gaffar Qureshi - अर्जदार**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई विभाग मुंबई हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

(अ) जंगम मिळकत : (वर्णन) **रू. १०००/-** (एक हजार रुपये फक्त)

(ब) स्थावर मिळकत: (वर्णन) **निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २७/११/२०२० रोजी दिली.

सही/-
**अधीक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई**

शिक्का


**ENBEE TRADE AND FINANCE LIMITED**
**(CIN: L50100MH1985PLC036945)**
**Registered office: B4 /C5, Gods Gift Chs Ltd, N M Joshi Marg, Lower Parel, Mumbai – 400013, Maharashtra.**
**E-mail Id:** enbeetrade@gmail.com **Website**: www.enbeetrade.com

*Notice is hereby given that the 35th Annual General Meeting ("AGM") of the Company is scheduled to be held on Monday, **December 21, 2020** at 11:30 a.m. at the registered office of the Company at B4 /C5, Gods Gift Chs Ltd, N M Joshi Marg, Lower Parel, Mumbai – 400013, Maharashtra. Members of the Company are hereby informed that pursuant to Section 108 of the Companies Act, 2013 and Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, the Company has on November 29, 2020 completed the dispatch of the notice of the Annual General Meeting by providing the facility of electronic voting to its members for seeking consent of Members for the items as stated in the notice of the Annual General Meeting dated November 13, 2020, for members meeting to be held on December 21, 2020 at 11:30 a.m.*

1. The Register of Members and Share Transfer Books of the Company will remain closed from December 15, 2020 to December 22, 2020 (both days inclusive) for the purpose of this Annual General Meeting.
2. Members can vote through electronic means. The Voting will commence on December 18, 2020 at 9.00 a.m. and ends on December 20, 2020 at 5.00 p.m. Members attending the meeting who have not already cast their vote by remote e-voting shall be able to exercise their right at the Annual General Meeting by poll.
3. The members who have acquired the shares after the dispatch of the Notice shall be eligible for voting through electronic mode by obtaining login Id and password after logging on www.evotingindia.com. The notice is also available on the website of the Company at www.enbeetrade.com
4. The remote e-voting shall not be allowed beyond the said date and time as mentioned above in point 2.
5. A member may participate in the general meeting even after exercising his right to vote through remote e-voting but shall not be allowed to vote again in the meeting.
6. Members whose name is recorded in the Register of Members or in the register of beneficial owners maintained by the depositories as on the cut-off date (i.e. December 14, 2020) only shall be entitled to avail the facility of remote e-voting as well as voting in the Annual General Meeting.
7. The Notice of Annual General Meeting will be available on www.enbeetrade.com and on the portal of the exchange where the securities are listed. If any members require physical copy of the notice can send a requisition on the registered office address of the Company situated at B4 / C5, Gods Gift Chs Ltd, N M Joshi Marg, Lower Parel, Mumbai – 400013, Maharashtra.
8. Ms. Isha S. Goraksha, Company Secretary and Compliance officer of the Company is responsible to address the grievances connected with facility for voting by electronic means and all the correspondence to that effect shall be addressed at registered office address: B4 /C5, Gods Gift Chs Ltd, N M Joshi Marg, Lower Parel, Mumbai – 400013, Maharashtra, e-mail: enbeetrade@gmail.com contact no: 022-24965566.

**For Enbee Trade and Finance Limited**
**Sd/-**
**Amar N. Gala**
**(DIN - 07138963)**
**November 30, 2020**    **Chairman & Managing Director**


**मे. उप निबंधक सहकारी संस्था, मुंबई (परसेवा) यांचे कार्यालय**
**दि. बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई**
भारतीय क्रिडा मंदिर बिल्डींग, ४ था मजला, सहकार नगर जवळ,
नायगांव रोड नं.२६, वडाळा, मुंबई - ४०००३१.

**जाहीर नोटीस**

**दि चेंबूर नागरिक सहकारी बँक लि.** ... अर्जदार
**१ ला मजला, हॉटेल पर्ल, एम.डी.एस. मार्ग,**
**चेंबूर, मुंबई - ४०००७१.**
**अनुक्रमांक १ ते ५** .... जाब देणार

खालील दर्शविलेल्या जाब देणार यांना नोटीस देण्यात येते की, थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुली दाखला मिळणे साठी दाखल केलेल्या अर्जासोबत तुमचे म्हणणे सादर करण्यासाठी आपणांस उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण राहत नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणांस एक शेवटची संधी देण्यात येत असुन दिनांक **१६.१२.२०२० रोजी दुपारी २.०० वाजता** आपण स्वतःवरील पत्त्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल याची आपण नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | जाब देणाऱ्याचे नाव | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | दावा रक्कम रुपये | जाब देणार क्रमांक | पुढील सुनावणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MUNAF ALI MURAD<br>MAHUVAWALA ABOOBAKAR MOHD JAFAR<br>SHAIKH MAINUDDIN FAREED<br>M/S. SHARMA AUTO<br>(PROP. KIRAN K. SHARMA) | 17.08.20 | 1453 /20 | 2,30,150.00 | 1<br>2<br>3<br>4 | 16.12.20 |
| 2 | SHAHAZADI MOHAMMED HAROON SHAIKH<br>KAMLESH MOHAN GUPTA<br>MOHAMMED HUSSAIN GULAM<br>HUSSAIN SHAIKH<br>M/S. SHARMA AUTO<br>(PROP. KIRAN K. SHARMA) | 17.08.20 | 1454 /20 | 1,52,965.30 | 1<br>2<br>3<br><br>4 | 16.12.20 |
| 3 | AJAY DAMODAR SHARMA<br>SAROJ ASHOKKUMAR KALLU<br>BHUVANESH KRISHNA MORE<br>M/S. SHARMA AUTO<br>(PROP. KIRAN K. SHARMA) | 17.08.20 | 1455 /20 | 1,71,707.75 | 1<br>2<br>3<br>4 | 16.12.20 |
| 4 | AARTI JAGDISH SHETE<br>JAYPRAKASH RAJNATH YADAV<br>LALBAHADUR RAMCHANDRA MAURYA<br>M/S. SHARMA AUTO<br>(PROP. KIRAN K. SHARMA) | 17.08.20 | 1456 /20 | 84,748.50 | 1<br>2<br>3<br>4 | 16.12.20 |
| 5 | ARUNKUMAR SURAJPRASAD YADAV<br>MEHBOOB BABU KHAN<br>SUNIL PANDIT LOKHANDE<br>M/S. SHARMA AUTO<br>(PROP. KIRAN K. SHARMA) | 17.08.20 | 1457 /20 | 1,28,241.79 | 1<br>2<br>3<br>4 | 16.12.20 |

ही नोटीस आज दिनांक २७/११/२०२० रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

शिक्का

सही/-
(सुनिल बनसोडे)
उपनिबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र शासन, मुंबई (परसेवा)

**मे. उप निबंधक सहकारी संस्था, मुंबई (परसेवा) यांचे कार्यालय**
**दि. बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई**
भारतीय क्रिडा मंदिर बिल्डींग, ४ था मजला, सहकार नगर जवळ,
नायगांव रोड नं.२६, वडाळा, मुंबई - ४०००३१.

**जाहीर नोटीस**

**दि चेंबूर नागरिक सहकारी बँक लि.** ... अर्जदार
**१ ला मजला, हॉटेल पर्ल, एम.डी.एस. मार्ग,**
**चेंबूर, मुंबई - ४०००७१.**
**अनुक्रमांक १ ते ५** .... जाब देणार

खालील दर्शविलेल्या जाब देणार यांना नोटीस देण्यात येते की, थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुली दाखला मिळणे साठी दाखल केलेल्या अर्जासोबत तुमचे म्हणणे सादर करण्यासाठी आपणांस उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण राहत नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणांस एक शेवटची संधी देण्यात येत असुन दिनांक **१६.१२.२०२० रोजी दुपारी २.०० वाजता** आपण स्वतःवरील पत्त्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल याची आपण नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | जाब देणाऱ्याचे नाव | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | दावा रक्कम रुपये | जाब देणार क्रमांक | पुढील सुनावणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | TATO RAGHO JALVI<br>DNYANOBA VITHOBA WAGHOLE<br>ANSAR MOHAMMAD SHAIKH<br>M/S. SHARMA AUTO<br>(PROP. KIRAN K. SHARMA) | 17.08.20 | 1448 /20 | 1,99,428.86 | 1<br>2<br>3<br>4 | 16.12.20 |
| 2 | SUNILKUMAR SHYAMDHAR UPADHYAY<br>AKSHAY ASHOK AUTI<br>VIJAY RAMBRIJ SINGH<br>M/S. SHARMA AUTO<br>(PROP. KIRAN K. SHARMA) | 17.08.20 | 1449 /20 | 1,56,770.20 | 1<br>2<br>3<br>4 | 16.12.20 |
| 3 | SHIVMOHAN RAMASHANKAR OJHA<br>SHRIVASTAV KAILASH PURUSHOTTAMLAL<br>AHMED BAIG ABDUL SATTAR BAIG<br>M/S. SHARMA AUTO<br>(PROP. KIRAN K. SHARMA) | 17.08.20 | 1450 /20 | 1,82,729.95 | 1<br>2<br>3<br>4 | 16.12.20 |
| 4 | RAJENDRA SHANTARAM KORGAONKAR<br>NANDA BHIMRAO GAIKWAD<br>CLAFY PETER JESINTO<br>M/S. SHARMA AUTO<br>(PROP. KIRAN K. SHARMA) | 17.08.20 | 1451 /20 | 1,19,334.61 | 1<br>2<br>3<br>4 | 16.12.20 |
| 5 | JAYANTILAL PURSHOTTAM BHANUSHALI<br>CHHAYA ASHOK MANE<br>MADHUKAR DAMU SHINDE<br>M/S. SHARMA AUTO<br>(PROP. KIRAN K. SHARMA) | 17.08.20 | 1452 /20 | 2,20,374.05 | 1<br>2<br>3<br>4 | 16.12.20 |

ही नोटीस आज दिनांक २७/११/२०२० रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

शिक्का

सही/-
(सुनिल बनसोडे)
उपनिबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र शासन, मुंबई (परसेवा)

## संपादकीय

# तंदुरुस्त आये

स्वयंसेवकांच्या लक्षणांचे मूल्यमापन करूनच जर औषध/लस यांची परिणामकारकता तपासली जाते; तर चेन्नईतील युवकाच्या आरोपाचा अव्हेर इतका तातडीने का?

करोनाच्या कटकटींनी लोक इतके कावलेले आणि कंटाळलेले आहेत की या विषाणूस रोखणारी लस उद्याच बाजारात आली तर ती खरेदी करण्यासाठी रांगा लागतील. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रास ग्रासणाऱ्या 'स्वाइन फ्लू' या तुलनेने कमी त्रासदायक आजारावरील कथित उपचार असणाऱ्या औषधासाठीही आपल्याकडे रांगा लागल्या होत्या. त्यावेळी त्या औषधाची परिणामकारकता किती याचे अद्ययावत ज्ञान रांगा लावणाऱ्यांना होते असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे आताही करोनावर इतक्या लशी बाजारात येण्यासाठी रांगेत असताना त्यातील नक्की कोणती, किती उपयुक्त याची साद्यंत माहिती नागरिकांना असेलच याची हमी नाही. यामागे जसे नागरिकांचे घायकुतीला येणे आहे तसेच त्यातून निर्माण झालेली अंधश्रद्धादेखील आहे. म्हणूनच नागरिकांच्या या असहायतेची जाणीव आणि त्या बाबतची संवेदनशीलता करोनावरील लस निर्मितीत गुंतलेल्या संबंधितांनी दाखवायला हवी. 'सीरम इनस्टिटय़ूट ऑफ इंडिया' या लसनिर्मितीतील अग्रगण्य कंपनीने ही खबरदारी घेतली, असे म्हणता येईल काय?

हा प्रश्न पडण्याचे कारण म्हणजे या कंपनीच्या संभाव्य करोना-लस चाचणीतील सहभागी स्वयंसेवकांवर कंपनीने गुदरलेला १०० कोटी नुकसानभरपाईचा दावा. सदर स्वयंसेवक चेन्नई परिसरातील असून 'सीरम'च्या लशीचा आपल्यावर दुष्परिणाम झाला, असे त्याचे म्हणणे आहे. चाळिशीतील या स्वयंसेवकाने स्वखुशीने ही लस टोचून घेतल्यावर त्यास सुरुवातीस काही झाले नाही. परंतु दहा दिवसांनी त्यास वांत्या झाल्या आणि आकलनक्षमतेवरही मोठा परिणाम झाल्याचे आढळले. यामुळे त्याच्या निर्णयक्षमतेवरही परिणाम झाला असून सुसंबद्धपणे एखादा मुद्दा मांडण्याची त्याची क्षमता घटल्याचे त्याच्या कुटुंबीयातर्फे भारतीय वैद्यक परिषद ते 'सीरम'कंपनी अशा सर्वाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. आपल्यावर लशीचा दुष्परिणाम झाल्याचे 'सीरम'ला कळवण्यात आले होते, परंतु त्यांनी त्याची दखल घेतली नाही, असे त्याचे म्हणणे. त्यामुळे सदर स्वयंसेवकाने कंपनीवर पाच कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईचा दावा ठोकला. आपल्या तक्रारीची कंपनीने योग्य ती दखल घेऊन सखोल चौकशी होईपर्यंत लशीच्या चाचण्या थांबवायला हव्या होत्या अशी त्याची मागणी. ती मान्य न झाल्याने त्यांनी कंपनीकडून नुकसानभरपाईची मागणी केली.

या मुद्द्यावर कंपनीने सदर स्वयंसेवकाशी किती संपर्क साधला आणि त्याच्या तक्रारीची किती सखोल खातरजमा केली हे कळावयास मार्ग नाही. परंतु दिसते ते असे की कंपनीने तक्रारदाराचा दावा फेटाळला. ते एकवेळ ठीक. पण उलट त्याच्याकडूनच १०० कोटी रुपयांची नुकसानभरपाई सीरम कंपनीस हवी आहे. सदर स्वयंसेवक हा दावा पैसे उकळण्यासाठी करीत असल्याचे कंपनीचे म्हणणे. लशी वा औषधे यांच्या चाचण्यांतील सहभागींच्या मनात त्याबाबत एक उदात्त हेतू असतो. तसेच; सर्व प्रक्रिया जाणण्याइतके ते सुजाण, सुशिक्षित असतात. त्यांच्यावर पैशाच्या हव्यासाचा आरोप ठेवणे अन्यायकारक ठरेल. सीरम कंपनीने ते केले. या संदर्भात भारतीय वैद्यक परिषदेतील तज्ज्ञांसह अनेकांनी कंपनीच्या या कृतीबद्दल नाराजी व्यक्त केली हे योग्यच. वास्तविक कंपनीसमोर मोठे आव्हान आहे. ते पेलण्यास ती सक्षम आहे, यात शंका नाही. परंतु म्हणून या अत्यंत महत्त्वाच्या आणि गुंतागुंतीच्या आजारावरील संभाव्य लशीच्या परिणामकारकतेविषयी एखाद्याने प्रश्न उपस्थित केल्यास तो झटकून टाकण्याचे काही कारण नाही. पाश्चात्त्य देशांत अशा लशींविषयी एखाद्याने जरी काही संशय/ शंका/ प्रश्न उपस्थित केल्यास त्याची तातडीने दखल घेऊन तीबाबत व्यापक पातळीवर संशोधन केले जाते. हेतू हा की संभाव्य लस वा औषध हे संपूर्णपणे निदरेष आणि निर्धोक व्हावे. त्यामुळे 'सीरम'ने तक्रारदारास मोडीत काढण्याऐवजी वा त्याच्या हेतूंबाबत प्रश्न निर्माण करण्याऐवजी त्याची अधिक गंभीरपणे दखल घेणे आवश्यक होते. 'सीरम' म्हणते त्या प्रमाणे संबंधित व्यक्तीच्या वैद्यकीय समस्या आणि त्याने घेतलेली लस यांचा कदाचित संबंध नसेलही. पण ते अधिक व्यापकपणे आणि शास्त्रीयदृष्टय़ा आयोजित चाचण्या वा परीक्षणांतून सिद्ध झाले असते तर अधिक प्रभावी ठरले असते. त्याची गरज होती.

याचे कारण असे की आपल्या लशीस तातडीने मान्यता मिळावी म्हणून आपण अर्ज करणार असल्याचे 'सीरम'चे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांनी याआधीच जाहीर केले आहे. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी असे केले जाते. कोणतेही औषध वा लस यास अधिकृत मान्यता देण्यासाठी ज्या काही नियम/शर्ती आणि प्रक्रिया असतात त्यांना अशा वेळी फाटा दिला जातो. करोना-कालीन आजारांत सध्या लोकप्रिय असलेल्या 'रेमडेसिविर' या औषधास अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या अधिकारांत मान्यता दिली. त्या आधी या औषधाची चाचणी अवघ्या काही रुग्णांवर घेतली गेल्याचे वृत्त त्यावेळी बरेच चर्चिले गेले. करोनावर 'रेमडेसिविर' हे जीवरक्षक असल्याचे मानले गेल्याने अशी आपत्कालीन मान्यता देणे योग्य असे समर्थन त्यावेळी करण्यात आले. तशाच पद्धतीने दीर्घकालीन प्रक्रिया टाळून 'सीरम'च्या लशीस बाजारात विकण्याची मान्यता दिली जावी असा कंपनीचा प्रयत्न आहे. तो योग्य असे मानले तरी त्यातून चेन्नई-स्थित स्वयंसेवकाप्रमाणे ही लस घेणाऱ्या अन्यांच्या तक्रारी येणारच नाहीत असे गृहीत धरणे धोक्याचे ठरेल. अशा काही रुग्णांनी त्यानंतर कंपनीकडे नुकसानभरपाई मागितल्यास ती कशी अव्हेरणार? लशीच्या चाचण्या घेतल्या जात असताना त्यासाठी तयार स्वयंसेवकांची वर्गवारी दोन गटांत केली जाते. त्यातील एका गटास खरे औषध दिले जाते तर दुसऱ्यास औषधाच्या नावाखाली साधेच काही निरुपद्रवी (प्लासिबो) दिले जाते. हे सर्व स्वयंसेवक आपणास खरे औषध दिले गेले आहे की प्लासिबो या विषयी पूर्ण अनभिज्ञ असतात. त्यानंतर या स्वयंसेवकांच्या लक्षणांचे मूल्यमापन करून औषध/लस यांची परिणामकारकता तपासली जाते. चेन्नई येथील स्वयंसेवकाने ज्या अर्थी औषधांच्या दुष्परिणामांची तक्रार केली त्या अर्थी तो प्लासिबो गटात नसणार हे उघड आहे. कंपनीतर्फेही तसे सांगण्यात आलेले नाही. म्हणजेच ही लस बाजारात आल्यावर ती टोचून घेणारेही प्लासिबो गटातील नसतील. अशावेळी सदर स्वयंसेवकाच्या तक्रारीची अधिक चौकस शहानिशा झाली असती तर संभाव्य ग्राहकांचा तीवरील विश्वास वाढण्यास मदत झाली असती.

त्याची गरज होती. याचे कारण देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच लशींबाबतच्या प्रश्नांची दखल घेतली होती. ''किती लशी बाजारात येतील, त्याच्या किती मात्रा द्याव्या लागतील, किंमत काय असेल या प्रश्नांची उत्तरे आपल्याकडे नाहीत. म्हणून संभाव्य लशींबाबत जास्तीत जास्त शास्त्रीय पातळीवर जनजागृती व्हायला हवी. लशीच्या (बाजारात येण्याच्या) वेगापेक्षा रुग्णांची सुरक्षा जास्त महत्त्वाची आहे,'' अशा अर्थाचे उद्गार पंतप्रधानांनी या बैठकीत काढले होते. ही

भूमिका अत्यंत योग्य. याचे कारण बाजारपेठीय यशाच्या अधीरतेमुळे सर्व धोक्यांकडे आवश्यक तितके लक्ष दिले गेले नाही, असा आरोप होण्यापेक्षा उशिरा आली तरी हरकत नाही, पण बाजारात आलेली लस संपूर्ण निर्धोकच असायला हवी. याबाबत 'सबसे तेज'पेक्षा 'देर आये, तंदुरुस्त आये,' हा दृष्टिकोन अधिक हितकारक ठरेल.

# आर्थिक वाटचाल पुढे नव्हे, मागे

चोल राजघराण्यातील सम्राट, मौर्य सम्राट हे हिंदू राजे द्रष्टे होते.. त्यांच्या काळात जागतिक व्यापाराला नक्कीच मुक्त वाव होता. आपण मात्र, करोनाकाळात एकीकडे गरिबांना थेट पैसा देण्याऐवजी कंपन्यांना तो देऊ केला आणि आता 'आत्मनिर्भर' होण्याच्या नावाखाली मुक्तव्यापारावर निर्बंधांची भीती आहे.

काही दिवसांपूर्वी सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. कृष्णमूर्ती सुब्रमणियन यांनी म्हटले होते की, 'भारताच्या चालू खात्यात २०२०-२१ मध्ये आधिक्य राहील. एप्रिल ते जून २०२० या वर्षांच्या पहिल्या तिमाहीत चालू खात्यातील आधिक्य १९.८ अब्ज डॉलर्सचे होते, जरी आपण नंतरच्या तिमाहीतील कामगिरी सध्या विचारात घेतली नाही तरी पहिल्या तिमाहीचा कल पाहता चालू खात्यावरील आधिक्य जास्तच असेल यात शंका नाही.'

चालू खात्यावरील हे आधिक्य हे अर्थव्यवस्थेतील 'अंडर हीटिंग' (मंदावलेली अर्थव्यवस्था) सारख्या चमत्कारिक आर्थिक प्रक्रियेचा भाग असू शकतो. त्याचा अर्थ असा की, जेव्हा मागणी कोसळलेली असते व कथित प्रोत्साहक आर्थिक योजना ज्या अगदी अयोग्य पद्धतीने लक्ष्य आखणाऱ्या व काहीशा तुटपुंज्या असतात आणि सरकारला मागणी पुन्हा पूर्वपदावर आणता येत नाही तेव्हा असे घडण्याची शक्यता असते. निदान आजपर्यंत तरी, मागणी पूर्वपदावर आणण्यात अपयशच आलेले दिसते.

मागणीचे एक वेगळे गणित आपण मांडू शकतो. त्याचा मुख्य घटक आहे औष्णिक प्रकल्पांवरील एकूण भार. ऊर्जामंत्र्यांच्या मते हा ऊर्जा भार २०२१-२२ मध्ये ५६.५ टक्के होईल. मग मागणीत वाढ होत नसलेल्या या स्थितीतही किरकोळ चलनवाढ ही ७.६१ टक्के, तर अन्नपदार्थाची महागाई ११.०७ टक्क्यांपर्यंत गेली आहे. याचा सगळा भार देशातील आधीच पिचलेल्या गरिबांच्या खांद्यावर पडत आहे.

रोजगारांचे आव्हान

इतर सर्व क्षेत्रांतील आर्थिक झाकोळाला कृषी क्षेत्रात एक चंदेरी किनार जरूर आहे, २०२० मध्ये आपल्याकडे रब्बी पिकांचे उत्पादन वाढले आहे. अन्नधान्य उत्पादन १४ कोटी ८० लाख टन होते, तर आता २०२० मधील खरीप हंगामातील उत्पादनाचा अंदाज १४ कोटी ४० लाख टनांचा आहे. ट्रॅक्टरची विक्री या वर्षी अंदाजे ९ टक्क्यांनी वाढली आहे; यातून कृषी क्षेत्रातील आर्थिक विकासाचा चढता आलेख दिसून येतो. ग्राहकोपयोगी वस्तूंच्या ज्या कंपन्या आहेत त्यांच्या वस्तूंना ग्रामीण भागात शहरी भागापेक्षा जास्त मागणी आहे, असे उलटे चित्र या वेळी निर्माण झाले आहे. असे असले तरी ग्रामीण भागातील लोकांची वेतनवाढ किंवा उत्पन्नवाढ कमी आहे.

हे सगळे संमिश्र चित्र आहे. आर्थिक क्षेत्रात हिरवाईपेक्षा करडा किंवा धुरकट रंगच अधिक दिसतो आहे. या सगळ्या स्थितीचा विचार करताना आपण स्थूल आर्थिक घटकांच्या मूल्यमापनाचे विकृतीकरण करून चालणार नाही. सर्वांगीण विचार केल्यास अर्थव्यवस्था वाईट अवस्थेत आहे. धोरणनिश्चितीत गोंधळल्यासारखी स्थिती आहे. आर्थिक स्थितीच्या पुनरुत्थानाबाबतचे दावे अतिरंजित आहेत. आर्थिक वाढ दाखवणारे खरे घटक वेतन, रोजगार व उत्पन्न हे आहेत त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

भारतीय अर्थव्यवस्था निरीक्षण केंद्र (सीएमआयई) या संस्थेच्या मोजणीनुसार बेरोजगारीचा सध्याचा दर हा ६.६८ टक्के आहे (सरकारकडे सध्या तरी वेतन, रोजगार, उत्पन्न याबाबतची माहिती उपलब्ध नाही.) कामगारांच्या प्रत्यक्ष सहभागावरून आपण काही अनुमाने काढू शकतो. कामगारांचा सहभाग हा केवळ ४१ टक्के आहे. महिला कामगारांचा सहभाग २५ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. रोजगार मिळत असलेल्या १०० जणांत केवळ ११ महिला आहेत असा त्याचा अर्थ, पण जर ११ जणांचे रोजगार गेले असतील तर त्यात चार महिला आहेत असा वेगळा नकारात्मक अर्थही यातून सामोरा येतो. सप्टेंबर २०१९ ते सप्टेंबर २०२० या काळात ११-१२ दशलक्ष लोक कामगार बाजारपेठेतून बाहेर आहेत.

श्रीमंतांना झुकते माप

देशाच्या आर्थिक सल्लागारांनी अर्थव्यवस्थेच्या 'अंडर हीटिंग'च्या आडून काही सकारात्मक अर्थ काढले असले तरी ते अर्थव्यवस्थेच्या 'ओव्हर हीटिंग' इतकेच वाईट असते. जेव्हा 'ओव्हर हीटिंग' होते तेव्हा चलनवाढ म्हणजे महागाई असते. व्याजदर मागणीअभावी वाढलेले असतात. आस्थापनांना उत्पादन वाढवण्यासाठी प्रोत्साहित केले जात असते. जर बाजारपेठा सुस्थितीत असतील तर सुधारणात्मक उपाययोजनांना उत्तेजन दिले जाते. नंतर मागणी व पुरवठा यातील समतोल पुन्हा साधला जातो.

जेव्हा 'अंडर हीटिंग' होते तेव्हा आपण काय केले पाहिजे याची चर्चा आता मी करणार आहे. 'अंडर हीटिंग' हे एक नवे आव्हान भारतापुढे आहे; ते पेलण्याची ताकद सध्याच्या सरकारमध्ये दिसत नाही. याचे कारण काही कंपन्यांचे तुष्टीकरण सरकार करत आहे त्यामुळे गरिबांना दिलासा मिळालेला नाही. याचे एक उदाहरण देतो ते असे की, कंपन्यांना सरकारने १ लाख ४५ हजार कोटींची कर सवलत दिली होती. कंपन्यांनी या वाचलेल्या पैशांची गुंतवणूक न करता साठवणूक केली, तो पैसा गरिबांना मोफत शिध्यासाठी (रेशन) किंवा थेट आर्थिक मदतीसाठी देता आला असता. जर गरिबांच्या हातात पैसा आला असता तर त्यांची उपासमार झाली नसती. तीन महिन्यांच्या काळात त्यांना अनेकदा उपासमारीची वेळ आली. जर थेट आर्थिक मदत मिळाली असती तर त्यांनी त्यातून अन्न, दूध, औषधे व जीवनावश्यक वस्तू, सेवा विकत घेतल्या असत्या. त्याचा परिणाम म्हणून मागणी वाढली असती.

व्यापार उलाढाली कमी आहेत. चालू खात्यावर आधिक्य आहे, रुपयाचे मूल्यवर्धन होत आहे, पण वरकरणी या गोष्टी किरकोळ वाटत असल्या तरी अर्थव्यवस्थेस घातक आहेत. त्यात पहिला बळी रोजगारांचा गेला आहे. अदृश्य अशा स्थूल आर्थिक घटकांचा परिणाम म्हणून देशातील भांडवलाची गुंतवणूक परदेशात होत आहे. भारतासारख्या विकसनशील देशाला आज भांडवलाची गरज आहे. अशा अवस्थेत आपण निर्यात आयातीच्या तुलनेत वाढवली आहे, तसेच भांडवलही परदेशात जात आहे. अमेरिकी उद्योग आपल्या या आर्थिक धोरणांना खदखदून हसत असतील व त्याची मजा लुटत असतील यात शंका नाही.

आत्मनिर्भरता की मनमानी?

आत्मनिर्भरतेची कल्पना ज्यांनी पुढे आणली त्यांना त्याचे असे परिणाम अपेक्षित नसतील अशी मला आशा आहे. जर आत्मनिर्भर याचा अर्थ 'स्वयंपूर्णता' हा असेल तर त्याचे स्वागत करू या. पण जर आत्मनिर्भर ही संकल्पना धोरण व अंमलबजावणी पातळीवर बचावात्मकता किंवा संकुचितपणा दाखवत असेल. आंतरराष्ट्रीय मुक्त व्यापाराला विरोध करीत असेल. आयात कर वाढवत असेल, परवाना व नियंत्रणराज परत आणणार असेल, अनिश्चित नियम व कायदे करणार असेल तर तो आत्मनिर्भरतेचा नव्हे तर आत्मघाताचा मार्ग आहे. पंतप्रधान मोदी हे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुढची पायरी गाठून असे काही करणार नाहीत अशी आशा आहे.

आपण एका विचित्र जगात राहतो आहोत कारण कम्युनिस्ट चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग हे मुक्त व्यापार, जागतिकीकरण यांचे गोडवे गात आहेत. दुसरीकडे भांडवलवादी अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प हे व्यापार करारांची थट्टा करून ते मोडीत काढत आहेत. जागतिक व्यापार संघटना, मुक्त व्यापार, हवामान बदल, पॅरिस हवामान करार काहीच त्यांना नको आहे. यातून जग गोंधळलेल्या अवस्थेत दिसून येते त्यात रचनाबद्ध किंवा विचारांती काही केलेले दिसत नाही, अशी दुरवस्था आहे. अनाकलनीय अशी दोन टोके गाठलेली त्यात दिसून येतात.

'आर्थिक वाढीचा हिंदू दर' या संकल्पनेबाबत अर्थतज्ज्ञ प्रा. राज कृष्णा यांनी जी मते मांडली होती त्यातून बाहेर येण्यास भारताला तीस वर्षे लागली. चोल राजघराण्यातील सम्राट, मौर्य सम्राट हे हिंदू राजे द्रष्टे होते यात मला काहीही शंका वाटत नाही. त्यांनी भारताची आर्थिक झेप चीन, इंडोनेशिया, रोम यांच्यापर्यंत नेली हेही खरे आहे. त्यांनी बाह्य जगाकडे डोळे उघडे ठेवून पाहिले. ते खरे जागतिकीकरणवादी होते. त्यांनी भारताचा जगातील सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २५ टक्क्यांपर्यंत नेला. पुढल्या काळात प्रशिक्षित असे अर्थतज्ज्ञ नव्हते तरी भारताने मुक्त व्यापार अंगीकारला, नवीन बाजारपेठा पादाक्रांत केल्या. त्यामुळे भारतात भांडवली ओघ म्हणजे संपत्ती वाढली. आपण त्या संपन्न वारशाकडे पाठ फिरवतो आहोत असे म्हटले तर ते अयोग्य ठरणार नाही.

आपण सध्या जी आर्थिक धोरणे अवलंबली आहेत ती आपल्याला कमी आर्थिक वाढीच्या काळाकडे नेणार आहेत.

'ऑक्सफर्ड इकॉनॉमिक्स'ने आपल्याला इशारा दिला आहे की, भारतातील पुढील पाच वर्षे ही कमी आर्थिक वाढीची असतील व हा दर सरासरी ४.५ टक्के असेल. ही धोक्याची घंटा आहे यात शंका नाही.

**लेखक भारताचे माजी अर्थमंत्री आहेत.**

# वर्षभरानंतरही राजकीय गूढ कायम !

लोकसभा निवडणुकीत युतीसाठी 'मातोश्री' वर गेलेले भाजपचे तत्कालीन अध्यक्ष अमित शहा विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेनेशी चर्चा करण्यासाठी मुंबईत का आले नाहीत हा प्रश्न आजही भाजप कार्यकर्त्यांना सतावत आहे.

गेल्या आठवडय़ात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतफत्वाखालील सरकारला एक वर्ष पूर्ण झाले. ठाकरे यांनी 28 नोव्हेंबर 2019 रोजी शिवाजी पार्कच्या मैदानावर मोठय़ा संख्येने जमलेल्या जनसमुदायाच्या साक्षीने मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. ठाकरेंच्या शपथविधीच्या पाच दिवस आधी म्हणजे 23 नोव्हेंबर 2019 रोजी देवेंद्र फडणवीस यांनी राजभवनात दुसऱयांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेऊन मोठा राजकीय भूकंप घडवून आणला होता. फडणवीस यांनी पहाटे शपथ घेतली. मात्र, त्यांना दिवसाउजेडी पायउतार व्हावे लागले. विधानसभा निवडणूक पार पडल्यानंतर पाच दिवसात दोन सरकारचे शपथविधी ही पहिलीच राजकीय घटना असावी. यापैकी फडणवीस सरकारच्या शपथविधीत अनेक राजकीय रहस्ये दडलेली आहेत. वर्षभरातरही या रहस्यांवरील गूढतेचा पडदा दूर झालेला नाही. विधानसभेची निवडणूक भाजपशी युती करून लढणारी शिवसेना निकालानंतर भाजप दूर का गेली? 2019 च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेने भाजपशी युती करावी म्हणून 'मातोश्री' वर गेलेले भाजपचे तत्कालीन अध्यक्ष अमित शहा निवडणूक निकालानंतर शिवसेनेशी चर्चा करण्यासाठी मुंबईत का आले नाहीत? उद्धव ठाकरे यांना लहान भाऊ मानणारे भाजपचे सर्वात शक्तिशाली नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठाकरेंची समजूत काढून त्यांना राजी का केले नाही? महाराष्ट्रासारखे महत्त्वाचे राज्य भाजपच्या हातून जात असताना मोदी-शहा जाणीवपूर्वक निक्रिय राहिले का? फडणवीस यांना दिल्लीतून मदत का झाली नाही? अजित पवारांसोबतच्या हातमिळवणीला शरद पवारांचा पाठिंबा मिळणार नाही हे ठाऊक असतानाही फडणवीस यांनी आपले राजकीय हसे का करून घेतले, अशा अनेक राजकीय प्रश्नांची उत्तरे अजूनही गुलदस्त्यात आहेत.

गेल्या वर्षी घडलेल्या सत्तानाटय़ाला गेल्या पाच वर्षात घडलेल्या राजकारणाची किनार होती हे स्पष्ट झाले आहे. 2014 ची विधानसभा निवडणूक शिवसेना आणि भाजपने एकमेकांच्या विरोधात लढवली होती. तरीही सरकार स्थिर ठेवण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेला सत्तेत सहभागी करून घेतले. तथापि, शिवसेना सत्तेत असून नसल्यासारखीच होती. सत्तेचा वापर करून फडणवीस यांनी दोन्ही काँगेसप्रमाणे शिवसेनेचेही राजकीय खच्चीकरण चालवले होते. त्यामुळे संतापलेल्या ठाकरे यांनी युतीत शिवसेना सडल्याचे आणि यापुढे युती न करता स्वबळावर निवडणूक लढविण्याचे विधान केले होते. मात्र, लोकसभा निवडणुकीआधी अमित शहा यांनी 'मातोश्री'ला भेट दिली आणि शिवसेनेने भूमिका बदलली. लोकसभा निवडणुकीआधीच दोन्ही पक्षात विधानसभेनंतर राज्यातील सत्तेची वाटणी समसमान होईल असे ठरले. त्याची घोषणा संयुक्त पत्रकार परिषदेत झाली आणि पुन्हा दोन्ही पक्ष एकत्र आले. विधानसभेला 105 जागा जिंकून भाजप मोठा पक्ष ठरला असला तरी आपल्याशिवाय भाजप सरकार स्थापन करूच शकत नाही हे स्पष्ट झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी भाजपला सत्तेच्या समसमान वाटपाची आठवण करून दिली. शिवसेनेच्यादृष्टीने यात मुख्यमंत्रिपदही होते. मात्र, फडणवीस यांनी अमित शहांच्या हवाल्याने शिवसेनेला मुख्यमंत्रिपदाचे कोणतेही वचन दिले नसल्याचे सांगितले आणि येथूनच राजकीय नाटय़ाला सुरुवात झाली. शिवसेना-भाजपमध्ये मुख्यमंत्रिपदावरून बिनसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर राष्ट्रवादीचे महत्त्व वाढले. राजकीय चाली खेळण्यात माहीर असलेल्या पवारांनी या बेबनावाचा अचूक फायदा उचलला. एका बाजूला शिवसेना आणि काँगेस तर दुसऱया बाजूला भाजपशी चर्चा सुरू ठेवली. मोदी-शहा यांचा उद्धव यांच्यापेक्षा शरद पवारांवर अधिक विश्वास होता. शिवसेनेला धडा शिकवण्यासाठी राष्ट्रवादीच्या मदतीने सरकार स्थापन करण्याला मोदी-शहांची पसंती होती. दिल्लीत तशा बैठका झाल्याचे सांगण्यात येते. मात्र, शेवटच्या क्षणी पवारांनी मोदींना भाजपसोबत सरकार स्थापन करण्यास असमर्थता दर्शवल्याची माहिती आहे. भाजपला नकार कळविल्यानंतर पवारांनी तीन पक्षांची मोट बांधायला घेतली. तीन पक्षांची आघाडी दृष्टपथात आली. 22 नोव्हेंबरच्या वरळीच्या नेहरू सेंटरला रात्री शिवसेना, काँगेस आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या बैठकीत आघाडीचे नेतफत्व उद्धव ठाकरे यांनी करावे असे ठरले. हा निर्णय झाल्यानंतर पुढे सरकार स्थापन करण्याची औपचारिकता बाकी होती. त्याच रात्री अजित पवारांनी बंड केले. या बंडाने आघाडीच्या स्वप्नाला सुरुंग लागला. अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या पाठिंब्याचे पत्र फडणवीस यांना दिले. पत्र हातात पडल्यानंतर दिल्लीतून काही तासात राष्ट्रपती राजवट उठविण्यात आली. त्यापाठोपाठ पहाटे तीन वा. मुख्य सचिवांच्या कार्यालयात शपथविधीची तयारी सुरू झाली. मध्यरात्री अधिकाऱयांना फोन करून राजभवनावर उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले. 23 नोव्हेंबरच्या पहाटे फडणवीस-अजित पवार यांचा शपथविधी पार पडला. त्या दिवशी वर्तमानपत्राची हेडलाईन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होणार अशी होती. मात्र, सकाळी टीव्हीच्या पडद्यावर फडणवीस मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताना दिसले. अजित पवारांच्या बंडाची कल्पना शरद पवारांना होती की नव्हती, हे अजून समोर आलेले नाही. मात्र, अजितदादांच्या बंडाची बातमी मिळताच राष्ट्रवादीचा पश्चिम महाराष्ट्रातील बडा नेता 'सिल्व्हर ओक'वर धडकला. पवारांनी तपशील जाणून घेतला आणि त्यानंतर अजित पवारांच्या बंडाची माहिती उद्धव ठाकरे यांना फोन करून दिली. सुप्रिया सुळे यांनी पवारांच्या नावे ट्विट करून या सरकारला पाठिंबा नसल्याचे जाहीर केले. त्याचवेळी दुपारी संयुक्त पत्रकार परिषद बोलावण्याचा निर्णय झाला. पत्रकार परिषदेपर्यंत अजित पवारांसोबत गेलेले अनेक आमदार पुन्हा स्वगफही परतले होते. परिणामी फडणवीस सरकार अल्पजीवी ठरले. आज वर्षभरानंतरही महाराष्ट्राच्या राजकारणात ठाकरे यांच्या शपथविधीपेक्षा फडणवीस-पवार यांच्या पहाटेच्या शपथविधीची जास्त चर्चा रंगते. त्यामुळे 24 ऑक्टोबर ते 28 नोव्हेंबर 2019 या दरम्यान घडलेल्या सत्ता नाटय़ातील वास्तव जोपर्यंत समोर येत नाही तोपर्यंत शपथविधीमागील राजकीय रहस्य कायम राहणार आहे.

# भारतीय छात्र सेना-आजचे शिक्षण

नॅशनल कॅडेट कॉर्प्स (राष्ट्रीय छात्र सेना) किंवा एनसीसी ही जगातील सर्वात मोठी गणवेशी युवक संघटना असून गेल्या दि. 22 नोव्हेंबर रोजी या संघटनेने आपला 72 वा वर्धापनदिन साजरा केला. या उत्सवाच्या काही आठवडय़ांपूर्वी केरळ उच्च न्यायालयाच्या एका महत्त्वपूर्ण निवाडय़ाने एनसीसीच्या कायदा तरतुदीत एक मोठा बदल करून पारंपरिकतेला एक सकारात्मक दृष्टिकोन दिला. 'एनसीसीमध्ये प्रवेश घेण्याचा कायदेशीर हक्क लिंगभेदामुळे नाकारता येणार नाही' अशी नोंद करत केरळ उच्च न्यायालयाने सर्व पंथियांना एक दिलासा दिला आहे. तिरुअनंतपुरममधील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱया एका तृतियपंथी विद्यार्थ्याने आपल्याला एनसीसीमधील प्रवेश नाकारल्याच्या मुद्द्यावरून न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. याचिकाकर्त्याने आपण 'स्त्री' किंवा 'पुरुष' पैकी एक लिंग अशी ओळख प्रवेश नोंदणीपत्रात न दिल्यामुळे एनसीसी युनिटमधून तिला वगळण्यास विरोध करण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. वरील याचिकेत एनसीसी अधिनियम कायदा 1948 मधील कलम 6 व भारतीय संविधानमधील परिच्छेद 14, 15 व 21 मधील कलमांचा भंग करणाऱया एनसीसीच्या प्रवेश नाकारण्याच्या मताला गैरवाजवी व बेकायदेशीर ठरवत न्यायालयाने तृतियपंथियांना एनसीसीमधील प्रवेशाला मान्यता दिली आहे. एनसीसीकडे फक्त 'स्त्री' व 'पुरुष' अशा दोन प्रकारच्या युनिट्स असून तृतियपंथी विद्यार्थी दोघांपैकी एका प्रकारात मोडत नसल्यामुळे अर्ज स्वीकारला जाऊ शकत नाही. त्यामुळे आपल्या निर्णयात भेदभाव, गैरवाजवीपणा किंवा राज्यघटनेचे उल्लंघन ठरत नाही, असे एनसीसीचे म्हणणे न्यायालयाने ग्राहय़ धरले नाही.

औपचारिक शिक्षण प्रक्रियेत मूल्यवर्धन करण्यात एनसीसीने दिलेले योगदान नाकारले जाऊ शकत नाही, असे थोर कार्य एनसीसीकडून आजवर झालेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतात विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक पातळीवरील अभिवृद्धी व बहुविध विकासामध्ये एनसीसीने प्रदीर्घ व ठोस अशी भूमिका बजावली आहे. एनसीसी आज उच्चशिक्षणातील अतिरिक्त क्रियाकल्पाचा (एक्स्ट्रा करिक्मयुलर) भाग असून विद्यार्थ्यांची शिकण्याची क्षमता, शारीरिक सामर्थ्य वाढविण्यात व मानसिक दुर्बलता घालविण्यात महत्त्वाची मदत करत आले आहे. आपल्या नियमित शिक्षणादरम्यान इतर व वेगळय़ा क्षेत्राचा अनुभव समृद्ध करण्यात आपले भावी आयुष्य आत्मविश्वासबद्ध, व्यावहारिक व शिस्तबद्ध करण्यासाठी भरपूर वाव देते. आपल्या देशातील एनसीसीची कल्पना साल 1917 मधील. तत्कालीन संरक्षण कायद्याची व्याप्ती स्पष्ट करताना सैन्य दलातील कमतरता दूर करण्याच्या उद्देशाने विद्यापीठ कॉर्प्सची (दल किंवा उपविभाग या अर्थाने) स्थापना करण्यात आली. 1920 साली देशात प्रांत कायद्याला मंजुरी मिळाल्यानंतर 'युनिर्व्हसिटी कॉर्प्स'ची जागा 'युनिर्व्हसिटी टेनिंग कॉर्प्स'ने घेतली. 1942 साली या विभागाचे नाव पुन्हा बदलत 'विद्यार्थी अधिकारी प्रशिक्षण विभाग' असे झाले व पुढे 1946 साली पं. नेहरू आणि एच. एन. कुंजरू यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली. देशातील तरुणाईला भारताचे चांगले नागरिक बनविण्यासाठी प्रशिक्षण आणि प्रेरणा देणारी संस्था स्थापन करून विद्यार्थीदशेत हे शिक्षण समांतर औपचारिक शिक्षणाबरोबरच देणे हा यामागील उद्देश होता. विद्यमान एनसीसी 16 जुलै 1948 साली एनसीसी कायदा 1948 च्या मंजुरीनंतर संरक्षण मंत्रालयाच्या अमलाखाली स्थापन झाली. 1949 मध्ये एनसीसीमध्ये 'मुलींसाठी' विभाग सुरू झाला. आधी सैन्य, मग वायु व नंतर नौदल शाखा 1950 साली जोडल्यानंतर एनसीसीला 'त्रिसेवा' अशी प्रतिमा प्राप्त झाली. नेहरूंच्या इच्छेनुसार त्याचवर्षी एनसीसीच्या अभ्यासक्रमात सामुदायिक विकास, समाजसेवा इत्यादी उपक्रमांची समाविष्टता करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या औपचारिक शिक्षणाबरोबरच त्यांना सामाजिक बांधीलकी, जबाबदारी व राष्ट्रनि÷ नागरिक बनविण्यात विद्यमान एनसीसी उपयुक्त असे कार्य करत असून संपूर्ण देशभरात हायस्कूल, महाविद्यालये आणि विद्यापीठांमधून कॅडेट भरती करते. या प्रवेशात जात-पात, धर्म किंवा स्त्राr-पुरुष असा भेद कधीच केला गेलेला नाही. साधारण 8 ते 13 वर्ष वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांना व 36 वय वर्षापर्यंतच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना एनसीसीमध्ये प्रवेश दिला जातो. तरुणांमध्ये धर्मनिरपेक्षतेची भावना जागृत करण्यासाठी एनसीसीमधील तीन वर्षाच्या शिक्षण काळात व माणूस, समुदाय व निसर्ग यामधील आंतर-निर्भरता संबंध शिकविण्यावर जोर दिला जातो. युवा सशक्तीकरणात वचनबद्ध असलेल्या एनसीसीची सुरुवात अवघ्या 20 हजार कॅडेट्सपासून होऊन आज देशभरातून 14.5 लक्ष विद्यार्थीसंख्या जोडणाऱया या संघटनेचे कार्य देशातील 716 पैकी 600 जिल्हय़ांमधील 16,300 शैक्षणिक संस्थांमध्ये छात्र सेनेचे कार्य पसरले आहे. छात्र सेना प्रशिक्षण महाविद्यालयीन स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य केले जावे, या प्रकारचे मत देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी व्यक्त केले होते. वास्तविक 1953 च्या दरम्यान सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी छात्रसेना प्रशिक्षण सक्तीचे होते. 1968 साली ही सक्ती सौम्य करून छात्रसेनेमधील प्रवेश स्वेच्छा तत्त्वावर केला गेला. सक्तीच्या छात्र सेना शिक्षणाचा उपयोग भारताला 1962, 1965 व 1971 च्या युद्धादरम्यानच्या काळात झाला. साल 1965 मध्ये छात्र सेनेतील विद्यार्थी व प्रशिक्षित शिक्षकांनी आपल्या सैन्यबळाच्या युद्धातील कार्यात महत्त्वाची मदत पुरविली. आपल्या विस्तीर्ण अशा देशात मोठय़ा प्रमाणात निरपेक्ष सेवा करण्यासाठी राष्ट्रप्रेरित नागरी मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेता व प्रामुख्याने सीमा व किनारी भागात एनसीसीचे कार्य वाढविण्यासाठी महत्त्वाकांक्षी योजना गेल्या 15 ऑगस्ट 2020 च्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासमोर मांडली आहे. सैन्य, नौदल व हवाई दल या तिन्ही प्रांतांमधील एकूण एक लक्ष अतिरिक्त छात्र सेना सामर्थ्य वाढविण्यासाठी नियोजनबद्ध कार्य सुरू आहे. यात प्रामुख्याने सीमावर्ती जिल्हे व सागरी किनारी राज्यांमधून छात्रसेनेच्या हवाई व नौदल तुकडय़ा उभारण्याचा दृढ संकल्प पंतप्रधानांनी केला आहे. मोठी विस्तार योजना व उच्च न्यायालयाने आदेशाद्वारे निश्चित केलेल्या प्रवेश मापदंडांमधील महत्त्वाचा बदल येत्या काळात अधिकाधिक तरुणांना सशस्त्र सैन्यात सामील होण्यास नक्कीच प्रवृत्त करतील. आपल्या औपचारिक शिक्षणाबरोबरीनेच विद्यार्थ्यांना निर्भेद, निःस्वार्थी व राष्ट्रप्रेमाच्या व्रताची व्याप्ती खोलवर वाढविण्यासाठी एनसीसीची गरज तीव्रतेने भासेल.

# ...तर महाराष्ट्र पेटल्याशिवाय राहणार नाही : राजू शेट्टी



कोल्हापूर : पंतप्रधानांनी ऊसाच्या एफआरपीप्रमाणे पिकांचा हमीभाव हा कायदेशीररित्या बंधनकारक राहील, असा स्पष्ट कायदा करावा व संतापलेल्या बळिराजाला शांत करावे. त्यावर येत्या दोन दिवसांमध्ये केंद्र सरकारने ठोस निर्णय घेतला नाही तर देशासह महाराष्ट्रसुद्धा पेटल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा माजी खासदार राजू शेट्टी सरकारला दिला आहे. स्वाभिमानीचे आजचे आंदोलन ही झलक आहे, केंद्राचे असेच धोरण राहिले तर यापेक्षाही उग्र आंदोलन होईल, असा इशाराही दिला.

दिल्लीतील शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी स्वाभिमानीने मंगळवारी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्यानंतर झालेल्या गोंधळानंतर निवासी उपजिल्हाधिकारी भाऊसाे गलांडे यांच्याकडे निवेदन देऊन पंतप्रधानांपर्यंत भावना पोहोचवा, अशी विनंती केली.

**अमित शहा यांचा निषेध**

शेतकऱ्यांच्या भावना काय आहेत हे समजून, विश्वासात घेऊन समजून काढणे तर बाजूलाच राहिले आहे, उलट, हे शिखांचे आंदोलन आहे, खलिस्तानवाद्यांचे आंदोलन आहे, अशी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी वक्तव्ये करून शेतकरी आंदोलनाना बदनाम केले आहे, याचा तीव्र शब्दांत निषेध आहे, असे शेट्टी यांनी सांगितले.

**पोलिसांनी धरली राजू शेट्टी यांची कॉलर**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या मोर्चात मोदींचा प्रतिकात्मक पुतळा जाळण्यावरुन मंगळवारी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पोलीस आणि शेतकऱ्यांमध्ये जोरदार झटापट झाली. यात माजी खासदार राजू शेट्टी यांना पोलीसांनी कॉलर धरुन खाली पाडल्याने एकच गोंधळ उडाला.

संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी मोदी व शहांच्या नावाने शंखध्वनी करत गनिमी काव्याने आणलेल्या पुतळ्याचे दहन केले. झाल्या प्रकारावरुन संतापलेल्या शेट्टी यांनीही मुर्दाबादच्या घोषणा देत धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असा दम दिल्याने वातावरण अधिकच तणावपूर्ण बनले. दिल्लीत सुरु असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी म्हणून मंगळवारी दुपारी राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. मोदी सरकार हाय हाय, तानाशाही नही चलेगी, शेतकऱ्यांना खलिस्तानवादी म्हणणाऱ्या शेतकऱ्यांचा धिक्कार असो अशा घोषणा सुरु झाल्या.

# सरकार पडणार याशिवाय विरोधकांकडे दुसरा कुठला मुद्दाच नाही



बारामतीः महाविकास आघाडी सरकार सर्वच पातळ्यांवर उत्तम काम करत आहे. गेल्या वर्षभराच्या काळात महाविकास आघाडी सरकारने उत्तम काम केलेले आहे. कोविड, अतिवृष्टी यासारख्या अडचणी व संकटावर सरकारने यशस्वी मात केली.परदेशातील लोक जेव्हा भारतात येतात तेव्हा जी माहिती त्यांना दिली जाते, त्यातही महाराष्ट्राने उत्तम काम केल्याचेच नमूद केलेले आहे, अशा शब्दात खासदार सुप्रिया सुळे यांनी महाविकास आघाडी सरकारचे कौतुक करतानाच विरोधकांना जोरदार टोला लगावला आहे.

बारामती शहरातील म.ए.सो. विद्यालयात पदवीधर मतदार संघ निवडणुकीच्या मतदानासाठी खासदार सुप्रिया सुळे आल्या होत्या. यावेळी त्यांनी मतदानाचा हक्क बजावल्यानंतर त्या पत्रकारांशी संवाद साधला.

यावेळी खासदार सुळे म्हणाल्या,विरोधकांना आरोप करण्याचा अधिकार आहे पण प्रत्यक्षात तुम्ही राज्यात जाऊन पाहिले तर अशी परिस्थिती नाही.सरकार पडणार ,या मुद्याशिवाय विरोधकांकडे टीका करण्यासारखा मुद्दाच नाही. त्यामुळे विरोधक, त्यांच्या पक्षातील कार्यकर्ते अस्वस्थ झालेले आहेत. त्यांना पक्षात टिकवून ठेवण्यासाठी सातत्याने सरकार पडणार असे म्हणावे लागते असा टोला सुळे यांनी लगावला.

शिक्षक व पदवीधरांचे प्रश्न संवेदनशीलपणे मांडण्यासाठी ही निवडणूक महत्वाची आहे. मतदानासाठी वातावरण चांगले आहे, हवाही स्वच्छ आहे. लॉकडाऊनमुळे प्रदूषण खूप कमी झाले आहे, महाविकास आघाडीची सत्ता आल्यापासून राज्यात वातावरण चांगले आहे, असे मिश्किलपणे सुप्रिया सुळे यांनी नमूद केले. वीजबिलांच्या तक्रारीसाख्या काही बाबींवर मोकळेपणाने बोलता येत नव्हते. आता आचारसंहिता संपल्यानंतर या बाबतचे धोरण आपल्याला लवकरच समजेल,असे खासदार सुळे म्हणाल्या.

# ‘ड्राय डे’ला दारुविक्री करणाऱ्या हॉटेलमालकाला अटक

पिंपरी : शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी यांनी ‘ड्राय डे’ घोषित केलेला असतानाही दारुविक्री करणाऱ्या हॉटेलवर पोलिसांनी छापा टाकला. रोकड, मोबाईल फोन तसेच दारुच्या बाटल्या, असा ४० हजार ९३१ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. तसेच हॉटेलमालकाला अटक केली. पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या सामाजिक सुरक्षा पथकाने चाकण येथे सोमवारी (दि. ३०) ही कारवाई केली.

नीलेश बाळासाहेब पानसरे (रा. चाकण), असे अटक केलेल्या हॉटेलमालकाचे नाव आहे. चाकण येथे शिक्रापरू रोडवर आरोपी याचे सार्ई मुद्रा व्हेज नॉनव्हेज नावाचे हॉटेल आहे. शिक्षक व पदवीधर मतदारसंघाची निवडणूक शांततेत पार पडण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी ‘ड्राय डे’ घोषित केला असे असतानाही आरोपी पानसरे हा त्याच्या हॉटेलमध्ये अवैधरित्या दारूची विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

# अवैधरित्या चंदनाची वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर कारवाई




शिक्रापूर : पुणे- नगर रोडवरील चाकण फाटा येथे पाठलाग करून पकडलेल्या टेम्पोतून चंदनाची छुपी तस्करी सुरु असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पंचवीस लाख ८३ हजार रुपयांच्या मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेने एकाला अटक केली आहे. ही कारवाई मंगळवारी पहाटे करण्यात आली. सूरज कैलास उबाळे (वय २४ रा.चांदा तालुका नेवासा, जि. अहमदनगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पद्माकर घनवट यांना पुणे-नगर रस्त्यावर एका टेम्पो (एमएच-१७. बीडी. २६९८) मध्ये चंदनाच्या झाडाची लाकडे अवैधरित्या चालवली आहेत अशी खबऱ्यामार्फत माहिती मिळाली होती. त्यानुसार त्यांनी पथकांना सूचना दिल्या. स्थानिक गुन्हे शाखेच्या वाहनाने टेम्पोचा पाठलाग करत शिक्रापुर येथे चाकण चौकात आले असता त्याला थांबवले. त्यानंतर पोलिसांनी चालकाची कसून चौकशी केल्यानंतर त्याने प्रथम गाड़ी रिकामी असल्याचे सांगितले. मात्र पथकाने गाडीची पूर्ण झड़तीघेतल्यानंतर गोण्यांमध्ये १९०किलोग्राम वजनाची चंदनाच्या गाभ्याची लाकडे मिळून आली. आरोपी सूरज कैलास उबाळे याला अटक केली.सदरची कार्यवाही पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक अभिनव देशमुख यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पद्माकर घनवट यांच्या मार्गदर्शनाखाली केली आहे.

# वर चॉकलेट, खाली एमडी ; ड्रग्ज माफियांचे नवे तंत्र



नागपूर : तपास यंत्रणांची नजर चुकविण्यासाठी ड्रग्ज माफियांनी ड्रग्ज तस्करीचे नवे तंत्र विकसित केले आहे. त्यानुसार चॉकलेट बॉक्स, मेडिसीन बॉक्स आणि गिफ्ट बॉक्सचा ड्रग्ज माफियांकडून बेमालूमपणे वापर केला जात आहे. गुन्हे शाखेच्या एनडीपीएस पथकाने केलेल्या कारवाईतून ड्रग्ज माफियांच्या या अजब शक्कलीचा उलगडा झाला आहे.

नायजेरियन तसेच विदेशी तस्करांच्या माध्यमातून मुंबईत वेगवेगळया अमली पदार्थांची नियमित मोठी खेप येत असते. ती नंतर मुंबईतून विविध राज्यात पोहोचविली जाते.

विशेष म्हणजे, महाग असूनही विविध अमली पदार्थांमध्ये सध्या एमडी (मेफेड्रोन)चा नशेसाठी मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. तीन हजारांपासून एमडीची पुडी विकत मिळते. नशा करणाऱ्याला काही वेळेसाठी एका वेगळया विश्वात असल्याची अनुभूती देणारे तरंग उठतात. तो अनुभव घेण्यासाठी नशेडी एमडी सप्लायर आणि पेडलर्सकडे घिरट्या घालतात. नागपुरात एमडीची मागणी आणि विक्री करणाऱ्यांची संख्या हजारोंच्या घरात आहे. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात एमडी आणली आणि विकली जाते. गेल्या काही महिन्यात गुन्हे शाखेच्या पथकाने एमडी तस्करांवर कारवाईचा धडाका लावल्यामुळे ड्रग्ज माफियांनी एमडी पोचण्यासाठी नवी शक्कल लढवली आहे. त्यानुसार आता एमडी पावडर गिफ्ट बॉक्स, मेडिसीन बॉक्स किंवा उच्च किमतीच्या चॉकलेट बॉक्समधून पाठवले जाते. त्यासाठी कुरिअरचा वापर केला जातो. शनिवारी आणि रविवारी स्थानिक एनडीपीएस पथकाने मुंबईहून नागपुरात आलेल्या ट्रॅव्हल्स बसमधून कुरिअरच्या माध्यमाने चौदा ते पंधरा लाखांचे एमडी पावडर जप्त केले. गिफ्ट बॉक्समध्ये एमडीच्या पॅकेटच्या वर महागडे चॉकलेट ठेवलेले होते. चॉकलेटच्या खाली आवरण आणि नंतर एमडीचे पॅकेट ठेवून होते. टिप पक्की असल्याने पोलिसांना फारशी कसरत करावी लागली नाही.

## पन्नास रुपयात पाच लाखाची एमडी

आतापर्यंत नागपुरातील एमडी तस्कर मुंबईत जाऊन किंवा मुंबईतील तस्करांच्या माणसाच्या हाताने इथे बोलवून घेत होते. मात्र पोलिसांकडून पकडले जाण्याचा धोका वाढल्यामुळे तस्करांनी आता गिफ्ट बॉक्समधून कुरिअरच्या माध्यमाने एमडीची तस्करी करणे सुरू केले. कुरिअर कंपनीला पन्नास रुपये देऊन ट्रॅव्हल्समधून मुंबईतून नागपुरात एमडीची खेप पाठवली जाते. शनिवारी सुमारे १० लाखांची तर रविवारी साडेपाच लाखांची एमडी अशाच प्रकारे नागपुरात पोचली.

## पोहोचवणाऱ्या- उचलणाऱ्याला मिळतात हजारो रुपये

ड्रग्ज माफियाकडून कुरिअरच्या ऑफिसपर्यंत एमडीचे पाकीट पोहोचवणाऱ्याला तीन ते चार हजार रुपये तर संबंधित शहरात कुरिअर कंपनीच्या कार्यालयातून तो बॉक्स उचलून ड्रग्ज सप्लायरच्या हातात पोहोचवून देणाऱ्याला तीन ते पाच हजार रुपये मिळतात, असे सांगितले जाते.

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा), मुंबई यांचे कार्यालय**
**दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई**
भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, सहकार नगर जवळ,
नायगांव रोड नं. २६, मुंबई-४०० ०३१.

## जाहीर नोटीस

**दि नॅशनल को-ऑप. बँक लि. ... अर्जदार**
रजि. ऑफिस
१२-बी, वत्सा हाऊस, २ रा मजला,
जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

**अनुक्रमांक १ ते २ ... जाब देणार**

खालील दर्शविलेल्या विषयासंदर्भात जाब देणाऱ्यांना नोटीस देण्यात येते की, थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुली दाखला** मिळणेसाठी दाखल केलेल्या अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करण्यासाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण रहात नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून **दिनांक १८.१२.२०२० रोजी दुपारी ०१.००** वाजता आपण स्वतः वरील पत्त्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण लक्षपूर्वक नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | जाब देणाऱ्याचे नाव | जाब देणार क्र. | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | दावा रक्कम रुपये | पुढील सुनावणी तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Mr. Kishor Somnath Chavhan (Borrower) | १ | २४.०८.२० | ११५४/ २०२० | ५,४८,५७०/- | १८.१२.२० दु. १.०० |
| | Mr. Somnath Roopsingh Chavhan (Guarantor) | २ | | | | |
| | Mr. Bansi Harishchandra Pawar (Guarantor) | ३ | | | | |
| २ | Mr. Jainabai Badiram Rathod (Borrower) | १ | २४.०८.२० | ११५५/ २०२० | २,५०,४६२/- | १८.१२.२० दु. १.०० |
| | Mr. Shantilal Khiru Chawan (Guarantor) | २ | | | | |
| | Mr. Tahir Sikandar Ansari (Guarantor) | ३ | | | | |
| | Mr. Namdev Badiram Rathod (Guarantor) | ४ | | | | |

ही नोटीस आज **दिनांक २७.११.२०२०** रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

सही/-
**श्री. सुनिल बनसोडे**
उपनिबंधक, सहकारी संस्था
**मुंबई (परसेवा) दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., मुंबई**
शिक्का

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा), मुंबई यांचे कार्यालय**
**दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई**
भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, सहकार नगर जवळ,
नायगांव रोड नं. २६, मुंबई-४०० ०३१.

## जाहीर नोटीस

**दि नॅशनल को-ऑप. बँक लि. ... अर्जदार**
रजि. ऑफिस
१२-बी, वत्सा हाऊस, २ रा मजला,
जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

**अनुक्रमांक १ ते २ ... जाब देणार**

खालील दर्शविलेल्या विषयासंदर्भात जाब देणाऱ्यांना नोटीस देण्यात येते की, थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुली दाखला** मिळणेसाठी दाखल केलेल्या अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करण्यासाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण रहात नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून **दिनांक १८.१२.२०२०** रोजी **दुपारी ०१.००** वाजता आपण स्वतः वरील पत्त्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण लक्षपूर्वक नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | जाब देणाऱ्याचे नाव | जाब देणार क्र. | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | दावा रक्कम रुपये | पुढील सुनावणी तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Mr. Santosh Gopal Chawan (Borrower) | १ | २४.०८.२० | ११५२/ २०२० | २,६६,९५६/- | १८.१२.२० दु. १.०० |
| | Mr. Chokla Bhiku Rathod (Guarantor) | २ | | | | |
| | Mr. Subhash Kisan Chawan (Guarantor) | ३ | | | | |
| | Mrs. Sitabai Gopal Chavan (Guarantor) | ४ | | | | |
| २ | Mr. Shankar Tipu Chouhan (Borrower) | १ | २४.०८.२० | ११५३/ २०२० | २,६१,१३१/- | १८.१२.२० दु. १.०० |
| | Mr. Genu Kisan Rathod (Guarantor) | २ | | | | |
| | Mr. Ishwar Laxman Rathod (Guarantor) | ३ | | | | |
| | Mrs. Nilabai Shankar Chouhan (Guarantor) | ४ | | | | |

ही नोटीस आज **दिनांक २७.११.२०२०** रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

सही/-
**श्री. सुनिल बनसोडे**
उपनिबंधक, सहकारी संस्था
**मुंबई (परसेवा) दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., मुंबई**
शिक्का

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा), मुंबई यांचे कार्यालय**
**दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई**
भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, सहकार नगर जवळ,
नायगांव रोड नं. २६, मुंबई-४०० ०३१.

## जाहीर नोटीस

**दि नॅशनल को-ऑप. बँक लि. ... अर्जदार**
रजि. ऑफिस
१२-बी, वत्सा हाऊस, २ रा मजला,
जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

**अनुक्रमांक १ ते २ ... जाब देणार**

खालील दर्शविलेल्या विषयासंदर्भात जाब देणाऱ्यांना नोटीस देण्यात येते की, थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुली दाखला** मिळणेसाठी दाखल केलेल्या अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करण्यासाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण रहात नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून **दिनांक १८.१२.२०२०** रोजी **दुपारी ०१.००** वाजता आपण स्वतः वरील पत्त्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण लक्षपूर्वक नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | जाब देणाऱ्याचे नाव | जाब देणार क्र. | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | दावा रक्कम रुपये | पुढील सुनावणी तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | M/s. Manish Masala Prop. Mr. Manish Prithviraj Jain (Borrower) | १ | २४.०८.२० | ११५०/ २०२० | २१,२९,२७९/- | १८.१२.२० |
| | Ms. Gautamidevi Prithviraj Jain (Guarantor) | २ | | | | |
| | Mr. Dashrath Kashiram Patel (Guarantor) | ३ | | | | |
| | Mr. Pavankumar Heeralal Jain (Guarantor) | ४ | | | | |
| २ | Mr. Somnath Roopsingh Chavhan (Borrower) | १ | २४.०८.२० | ११५१/ २०२० | २,२५,२९४/- | १८.१२.२० |
| | Mr. Kishor Somnath Chavhan (Guarantor) | २ | | | | |
| | Mrs. Gangibai Somnath Chavhan (Guarantor) | ३ | | | | |
| | Mr. Ganesh Somnath Chavhan (Guarantor) | ४ | | | | |

ही नोटीस आज **दिनांक २७.११.२०२०** रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

सही/-
**श्री. सुनिल बनसोडे**
उपनिबंधक, सहकारी संस्था
**मुंबई (परसेवा) दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., मुंबई**
शिक्का

# घर चमकविण्याचे विकली गाईड



घराला स्वच्छ ठेवणे हे काही सोपे नाही. खासकरुन घरात लहान मुले असतील तर सफाई करता करता आपल्या नाकीनऊ आलेच म्हणून समजा. पण सफाई तर करावीच लागते. या विकली गाईडने असे ठेवा आपल्या घराला चकाचक...

## सोमवारी बेडरूम

दिवसभराच्या थकव्यानंतर रात्री स्वच्छ बिछाना झोपायला मिळाला तर याहून आनंदाची दुसरी काय गोष्ट असेल. यासाठी सोमवार हा खास आपल्या बेडरुमच्या सफाईसाठी ठेवा. यात उशीचे कव्हर बदलणे, पेंटींग, फोटोफ्रेम साफ करणे या गोष्टी तुम्ही करू शकता.

## हॉल

फर्निचर साफ करा, हॉल व्हॅक्युम क्लिनरने साफ करा. शोपीस, टी.व्ही आणि बाकी वस्तुंना साफ करा.

## बुधवारी किचन

तसे पाहिले तर आपण किचन रोजच साफ करतो. पण बुधवार एक खास दिवस ठरवून त्यावेळी पॉट स्टँड, मायक्रोवेव्ह, रेफ्रिजरेटर, किचन स्लॅब यांसारख्या गोष्टी स्वच्छ करा.

## गुरुवारी बाथरूम

एक दिवस फक्त बाथरूम साफ करा. खासकरून बाथरूमचे टाईल्स, फ्लोर, आरसा, वॉशबेसिन साफ करा.

## शुक्रवारी मुलांची खोली

लहान मुले खोली खराब करण्यात एक्सपर्ट असतात. त्यामुळे त्यांची रूम साफ करण्यात तर एक संपूर्ण दिवस लागणारच.
आता वाचले केवळ दोन दिवस, शनिवार आणि रविवार तर हे दोन दिवस फुल रेस्ट करा आणि आपल्या कुटुंबासोबत एंजॉय करा.

# मातीच्या भांड्यांचा क्लासी टच



मातीच्या भांड्यांनी घर सजविल्याने तुमच्या घराला एक पारंपरिक लूक तर मिळतोच त्याचबरोबर घर एका रिफ्रेशिंग मूडमध्ये राहते. मातीच्या वस्तुंनी विविध पद्धतीने तुमचे घर सुंदर बनवता येते. त्यांच्यामध्ये मॉडर्न लूक आणि पारंपरिक सौंदर्य यांचे मिश्रण असते. तुमचे घर सजवताना पुढील काही वस्तू तुम्ही वापरू शकता.

## बैठक खोली

वेगवेगळ्या आकाराचे आणि रंगांचे प्लॅस्टिकरुपी चमकदार पोर्सेलिनपासून बनवलेल्या फुलदाण्या बैठक खोलीमध्ये ठेवा. त्यावरील चमकदार तुकडे तुमची खोली फ्रेश ठेवतील. तर वेगवेगळ्या अरेंजमेंटमधील फुले तुमच्या खोलीला क्लासी आणि सोफेस्टिकेटेड बनवतील.

## किचन

किचनसाठी तुम्ही सिरॅमिकपासून बनविलेल्या वस्तू वापरा. तुम्ही सिरॅमिक कॅसेरोल, डिश, सर्व्हिंग आणि मिक्सिंग बाऊल्स, मीठ आणि मिरपूडच्या डब्या, प्लेट्स वापरू शकता. यात तुम्ही स्टोन वेअर पोटरी प्रोडक्टस ज्यामध्ये हॅन्डमेड मग्स आणि इतर पेल्यासारख्या वस्तू तुम्ही वापरू शकता. तुम्ही वापरत असलेल्या वस्तू मायक्रोवेव्हला सेफ असतील, याची खात्री करुन घ्या. वेगवेगळ्या डिझाईन्सच्या वस्तू तुमच्या घराच्या नैसर्गिक सौंदर्यात भर घालतात.

## बाथरूम

बाथरूममध्ये शेविंग सेट आणि टॉयलेट पेपर स्टँडसाठी स्टोनवेअर पॉटरी आयटम्स वापरू शकता. तुमच्या दैनंदिन जीवनात आर्ट आणण्याचा हा एक उत्तम पर्याय आहे.

## लायटिंग

अनेक प्रकारचे हॅन्डमेड पॉटरी लॅम्प्स उपलब्ध आहेत. जे लाईट नसलेल्या काळात तुमच्या कामी येतात. हे लॅम्प्स स्टोन आणि मातीपासून बनविलेले असतात जेणेकरून यात मेणबत्या लावणे सोपे जाते. हे लॅम्प सुंदर, मंद प्रकाश देतात.

# हिवाळ्यात करा घराची सजावट



थंडीच्या दिवसांमध्ये तुमच्या घराची खास पद्धतीने सजावट करण्याची वेळ आली आहे. तुमची बेडरुम, लिव्हिंग रुम आणि किचनसुद्धा हिवाळ्याच्या दिवसात अधिक उठून दिसण्यासाठी येथे काही टिप्स दिल्या आहेत. या हिवाळ्यात खास विंटर कलेक्शन आणि रेट्रो फर्निचरचा वापर करा. तसेच भिंतींवर गडद रंगसंगतीच्या पार्श्वभूमीवर काही होम ॲक्सेसरीज वापरू शकता...

## मिक्स अँड मॅच प्रिंट्स

टाईल्ड मोझेक वॉलपेपर वापरुन अपारंपरिक पद्धतीने भौमितीक आकारांची उत्स्फूर्तता वातावरणात आणा. या वॉलपेपरसोबत बेडशीट आणि पांघरायच्या रगांवरचे प्रिंटिंग मॅच करा. भिंती मेटल फिनिश रंगांनी रंगवा आणि वातावरणात वेगळेपणा आणा.

## आरसा असलेल्या वॉल ॲक्सेसरीज

तुमच्या लिव्हिंग रुमला मॉडर्न रेट्रो आउट लूक द्या. भिंतीवर लावण्यासाठी तुम्ही आरशाचा वापर केलेले क्लस्टर वापरू शकता. या नक्षीकामात वेगवेगळ्या मोजमापाचे, विविध आकाराचे प्रकार वापरुन हिवाळ्यासाठीची गृहसजावटीचा पॅटर्न सुसंगत करता येईल.

## लेअरिंग

अंथरायचे कपडे वातावरणात कायमच उबदार तसेच सुखदपणा आणतात. तुमचा सोफा असो किंवा बेड, विणकाम केलेले अंथरुण तसेच वेलवेटचे कुशन यांचे लेअर्स वाढवा. त्यातून जागेतील जिवंतपणा अधिक वाढेल.

## कलात्मक परिणाम द्या

रेनेसासन्स कालखंडापासून प्रेरणा घेतलेले एखादे स्टिल लाईफ फ्लोरल (फुलांच्या आकारातील नक्षीकाम) किंवा फॅमिली पोर्ट्रेट लावा. असे नक्षीकाम कुशनवर करायचे की भिंतींवर हा तुमचा निर्णय आहे.
हिवाळ्यात तुमच्या गृहसजावटीला उठावदारपणा आणण्यासाठी या वेगळ्या कल्पना नक्कीच उपयोगी ठरतील.

# घराला असे बनवा ऊबदार

प्रत्येकालाच आपले घर सुंदर आणि सर्व सुखसोयीयुक्त असावे, असे वाटते. या हिवाळ्यात तुम्ही घर उबदार बनवून तुमच्या सभोवतालचा मूड बदलून टाकू शकता. घरामध्ये केलेले थोडेसे बदल, जसे की खोलीचा रंग, फर्निचरची रचना, लायटिंग आणि गृहसजावटीचे साहित्य यामुळे घर अधिकच सुंदर आणि ऊबदार बनवता येईल.



## रंगसंगती

घरातले कपडे, पडदे आणि गृहसजावटीचे साहित्य यांना अनुसरुन वेगवेगळ्या शेडसचे उष्ण रंग निवडा आणि तुमच्या खोलीचे रुप बदला. पिवळा, लाल किंवा नारंगी रंग निवडा कारण हे रंग नैसर्गिक प्रकाश उत्तमप्रकारे परावर्तित करतात. न्यूट्रल इफेक्टसाठी पिवळा बेस असलेल्या शेडस चालतील.

## सजावटीचे साहित्य

गृहसजावटीचे साहित्य तुमचे घर ऊबदार बनवू शकते. वेगवेगळ्या प्रकाराचे कपडे आणि त्यांच्या छटा घराच्या सोंदर्यात आणखीनच भर टाकतील. घरातील फर्निचर, कपडे आणि गालिचे यांचे रंग गडद असू द्या. तसेच सोफ्यावर जास्तीत-जास्त उशा असू द्या. याने तुमच्या खोलीचा ऊबदारपणा आणि आरामदायीपणा वाढेल.

## झाडे

तुमच्या खोलीतील ऊबदारपणा वाढविण्यासाठी, असे मार्ग शोधा जे कमी खर्चिक असतील. कुंड्यांमध्ये छोटी झाडे, फुलांची रोपे लावून ती घरामध्ये ठेवा. याने खोली अधिक जिवंत वाटेल. यासाठी अशा वनस्पतींची निवड करा, ज्यांना कमी सूर्यप्रकाशाची गरज असते तसेच ज्यांची कमीत-कमी काळजी घ्यावी लागते. पण, त्यांना वाढीसाठी पुरेसा सूर्यप्रकाश मिळेल, याची देखील काळजी घ्या.

## लायटिंग

नैसर्गिक आणि कृत्रिम दोन्ही प्रकारचा प्रकाश तुमच्या घरातील सौंदर्यासाठी तसेच ऊबदारपणासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. भरपूर प्रकारच्या मेणबत्या खोलीमध्ये ठेवा. मेणबत्तीचा प्रकाश, आजूबाजूचा परिसर सुखदायक करून, तुमच्या खोलीचे सौंदर्य वाढवेल. घरातील योग्य प्रकाशयोजना उजेड तर देतेच त्याचबरोबर घरात ऊबदेखील निर्माण करते.

# इटालियन फर्निचर बिन बॅग्ज



इटालियन फर्निचरचा उत्तम नमुना म्हणजे बिन बॅग्ज होय. उच्चभ्रू सोसायट्यातूनच नव्हे तर नवे घर घेणाऱ्या प्रत्येकालाच आपल्या घरातही बिनची एखादी गोष्ट असावीच असा आग्रह असतो. पूर्वी ठरावीक शहरात विक्रीस असणाऱ्या हे बिन सीरिज फर्निचर आता सहजपणे मिळते आहे. साधारणपणे ६०० च्या पुढे अगदी लाखभर किमती असणाऱ्या या बिन सीरिजमध्ये बिन चेअर, बिन बॅग्ज, बिन सोफा, बिन कोच, बिन बेड, बिन किडस झोन, बिन गेम्स आदी वस्तू उपलब्ध आहेत.

- स्टायरोफोमने भरलेली ही बॅग्ज विविध रंगांत मिळते. दर्जेदार लेदर पॅकमध्ये उपलब्ध असणाऱ्या बॅग्ज अर्थातच बिन फर्निचर अतिशय सुखद असते.
- हाताळायला तसे सोपे असतले तरी बच्चे कंपनींना हे फर्निचर वापरताना यावर उड्या मारताना थोडी खबरदारी घेण्याबाबतची सक्त ताकीद आधीच द्यावी.

# म्युरल्सची जादूई दुनिया

**लाकडातील** कार्व्हिंग्ज काही वेळा झाडांच्या बुंध्याचे निसर्गतः असणारे आकार, विशिष्ट पद्धतीने खोडाला पडलेला पीळ किंवा मोठ्या खोडाला एखादा कट देऊन तयार झालेला बैठा सपाट भाग असे आकार वापरले जातात. काही वेळा मोठ्या खोडामधील काही भाग पोखरून त्याला विविध आकार दिले जातात. असे आकार दिवाणखान्यातील सजावटीसाठी मोठ्या प्रमाणात वापरले जातात. त्यांचा नैसर्गिक लूक तसाच ठेऊन टिकण्यासाठी त्यावर सहसा वॉर्निश पेन्ट लावला जातो. असे आकार केवळ सजावटीसाठी ठेवले जातात किंवा टीपॉय स्टँड, होल्डर असे उपयोगही केले जातात.

म्यूरल्स आणि पेंटिंग्जची निवड करताना घरातील भिंतींच्या रंगांबाबत बारकाईने विचार केला जातो. हे रंग विषयाप्रमाणे ठरतात. लाकडी म्युरल्ससाठी चकचकीत आणि ब्राईट दिसणारे ऑईलपेन्ट कलर वापरले जातात. राखाडी, पिवळा, सोनेरी आणि लाल असे कॉम्बिनेशन अधिक प्रमाणात वापरले जाते आणि ते उठूनही दिसते. सेपोरेक्समध्ये कोरलेल्या

म्युरलसाठी सहसा एकाच रंगाचे शेडिंग केले जाते. शक्यतो गुलाबी, फिकट निळा, चंदेरी असे रंग अधिक प्रमाणात वापरले जातात. म्युरलसाठी आवडीनुसार कोणताही प्रकार निवडता येतो. मात्र लाकडी म्युरल्ससाठी ऑईलपेन्ट



वापरलेला असल्यामुळे ती नियमित पुसून स्वच्छ ठेवता येतात. सेपारेक्सची म्युरल्स त्या मानाने नाजूक असतात. तीक्ष्ण, धारदार वस्तुचा आघात झाल्यास त्याचे टक्के उडू शकतात. घरात लहान मुले असतील तर या म्युरल्सना फार जपावे लागते. घराच्या भिंती म्युरल्सने सजवताना वेगवेगळे प्रयोग करून पाहता येतात. भिंत भरून एकच पेटिंग्ज किंवा म्युरल हा सजावटीचा एक प्रकार आहे.

# घरातील सुंदर वॉलपॅनेल्स

सजवण्यासाठी जसा रंगांचा उपयोग होतो, तसाच वॉल पेपर, पोस्टर्स, फिल्म आणि कपड्यांची पॅनेल्स यांचा उपयोग होऊ शकतो. विविध प्रकारचे, रंगांचे, टेक्श्चरचे आणि किमतींचे वॉल पेपर बाजारात उपलब्ध आहेत. यासाठी आपल्या भिंती मात्र लांबी भरून गुळगुळीत करून घ्याव्या लागतात. त्यावर सोल्युशन लावून पेपर लावला की, झाली भिंत तयार! अगदी सात-आठ रुपये चौरस फुटांपासून हे पेपर उपलब्ध आहेत. मात्र टिकण्याच्या दृष्टीने विचार करूनच त्यांचा वापर केला पाहिजे. शिवाय ते ओल्या फडक्याने पुसता आले पाहिजेत.

- याचप्रमाणे विविध नैसर्गिक देखावे असणारे अत्यंत नयनमनोहर असे वॉल पोस्टर्स मिळतात, तेही वॉल पेपरच असतात. यांचा वापर करून त्यावर जर सुयोग्य असे लायटिंग केले तर खोलीचा आकार, माप, खिडक्या, प्रकाश यांचा सांगोपांग विचार केला पाहिजे, नाही तर खोली बेढब दिसू शकते.
- याचप्रमाणे लाकूड किंवा प्लायवूडचा वापर करून भिंतीवर पॅनेल तयार करता येते किंवा आपल्याला हव्या त्या कापडाचा वापर करून भिंत सजवता येते. प्लायवूडऐवजी सॉफ्टबोर्ड वापरल्यास त्याचा पिनअप बोर्ड म्हणूनही वापर करता येतो.



## घरात असावे केनचे फर्निचर

फर्निचरसुद्धा घराच्या साज-सज्जेचा महत्त्वपूर्ण भाग असतो. बदलणाऱ्या काळात फर्निचरचे डिझायनसुद्धा बदलत आहे. आजकाल लाकडाच्या फर्निचर बरोबरच केनपासून तयार फर्निचर घराची शोभा वाढवत आहे.

केनपासून तयार फर्निचरांची विशेषता म्हणजे त्याला कधी दिमक लागत नाही. पण लाकडाच्या फर्निचरला नेहमी दिमक लागण्याची शक्यता असते. म्हणून केनचा फर्निचर लाकड्याच्या फर्निचरापेक्षा जास्त टिकाऊ असतो.

या फर्निचरमध्ये खुर्चीपासून कपाटापर्यंत सर्व काही बाजारात उपलब्ध आहे. त्या शिवाय केनच्या फर्निचरमध्ये डायनिंग टेबल सेट, सोफा, टेबल सर्वच बाजारात सामान्य किमतीत उपलब्ध आहे. केनच्या फर्निचर वर पॉलिशिंग करून त्याला अजून चमकदार व आकर्षक बनवू शकता.



# बेडरूममध्ये सुंदर प्रकाशाची योजना


घराची दुरुस्ती करायची म्हणजे खिशाला कात्री लागू शकते. पण, तुम्ही हुशारीने दुरुस्ती केली तर असे होणार नाही. प्रकाश योजना, फर्निचर, भिंती आणि ॲक्सेसरीज गृह सजावटीचा महत्त्वाचा भाग आहे. यामुळे तुम्ही फक्त एका रंगाच्या ब्रशने आणि काही रचनांच्या बदलाने घराचे संपूर्ण स्वरूप बदलू शकता.

## फर्निचर

स्वयंपाकघरातील जुन्या कॅबिनेटच्याऐवजी आधुनिक आणि मॉड्यूलर स्टेनलेस स्टीलच्या खुल्या शेल्फचा वापर करा. घराच्या सजावटीची सर्व रचना सौंदर्यशास्त्र व उपयुक्ततेवर अवलंबून आहे. बेडरूम आणि लिव्हिंग रूममधील जागा प्रशस्त किंवा सुखावह करण्यासाठी फर्निचरच्या जागा बदलणे पुरेसे आहे.

## भिंती आणि ॲक्सेसरीज

एक साधी आणि अनेकवेळा पुनरावृत्ती करण्यात आलेली टिप म्हणजे, घरात बदल घडवायचा असेल तर भिंती रंगवल्याने सर्वकाही बदलते. रंगाच्या नमुन्याच्या मदतीने विविध रंगावर विविध प्रकाश योजनेचा चाचणीसाठी वापर करा. पोत, भिंतीवरील कला आणि डिझाईन हा देखील चांगला पर्याय आहे. टिन चौकोन, सजावटीच्या फरशा आणि रिक्त लाकडी फ्रेम यासारख्या ॲक्सेसरीज भिंतीवर लावल्याने देखील घर आकर्षक दिसते आणि त्याचे महत्व वाढते.



## कशी असावी रचना

प्रकाशयोजना उंचावर केल्याने सिलिंग उंच असल्याचा आभास मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकतो. घरातील काही भागाला सावलीचा परिणाम द्यायचा नसल्यास, जागा योग्यप्रकारे प्रकाशित ठेवणे आवश्यक आहे. कधी-कधी रंगाच्या छटा बदलणे आवश्यक असते. यामुळे डोळ्याला शांतता देणाऱ्या प्रकाशाचे उबदार प्रकाशामध्ये बदल करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. उभे दिवे, लोलक आणि वॉर्म ग्लोसह निर्देशक प्रकाश योजनेची निवड चांगली आहे.

# २०२१चा ट्वेंटी-20 वर्ल्ड कप भारतातून UAEत शिफ्ट होणार

## पाकिस्तान क्रिकेट मंडळाचा दावा





भारतात पुढील वर्षी होणारा ट्वेंटी-20 वर्ल्ड कप UAEत शिफ्ट होईल, असा दावा पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे ( PCB ) CEO वासीम खान यांनी केला आहे. कोरोना व्हायरसमुळे भारतात २०२१चा वर्ल्ड कप होणार नसल्याचेही खान म्हणाले. कोरोनामुळे ऑस्ट्रेलियात यंदा होणारा वर्ल्ड कप रद्द करावा लागला आणि २०२२मध्ये ऑस्ट्रेलियाला पुन्हा ट्वेंटी-20 वर्ल्ड कप स्पर्धेचे यजमानपद मिळाले आहे.

२०२०चा वर्ल्ड कप रद्द झाल्यानंतरही भारताने २०२१च्या वर्ल्ड कप स्पर्धेचे यजमानपद कायम राखले. पण, आता भारतात पुन्हा कोरोना व्हायरल डोकं वर काढताना दिसत आहे. काही राज्यांमध्ये कोरोनाची दुसरी लाटही आलेली पाहायला मिळते. याचाच आधार घेत खान यांनी भारतात पुढील वर्षी वर्ल्ड कप आयोजन करण्याची परिस्थिती दिसत नसल्याचा दावा केला. "पुढील वर्षी भारतात ट्वेंटी-20 वर्ल्ड कप होणार की नाही, याबाबत साशंकता आहे. कारण, तेथील कोरोना परिस्थिती... त्यामुळे पुढील वर्षी ट्वेंटी-20 वर्ल्ड कप UAEला शिफ्ट होऊ शकतो,"असे खान म्हणाले.

कोरोना व्हायरसच्या वाढत्या संख्येमुळे यंदाची इंडियन प्रीमिअर लीग ( IPL 2020 ) BCCIनं UAEत खेळवली. २०२१मध्ये इंग्लंडचा संघ भारत दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे. ऑगस्टमध्ये भारतीय संघ कसोटी मालिकेसाठी इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे आणि त्यानंतर ट्वेंटी-20 वर्ल्ड कप होणार आहे. या स्पर्धेसाठी पाकिस्तानी खेळाडूंना व्हिसा मिळावा, यासाठी खान यांनी ICC व BCCI कडे विनंती केली होती.

भारतीय संघ जानेवारी ते डिसेंबर २०२१ या कालावधीत १४ कसोटी, १६ वन डे व २३ ट्वेंटी-20 सामने खेळणार आहेत. त्याव्यतिरिक्त आशिया चषक ट्वेंटी-20 ( जून ), आयसीसी वर्ल्ड कप ( ऑक्टोबर ) आणि आयपीएल 2021 हे आहेच. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरून जानेवारी मायदेशात परतल्यानंतर टीम इंडिया दोन महिने इंग्लंड संघाचा पाहुणचार घेणार आहे. इंग्लंडचा संघ भारत दौऱ्यावर येणार असून त्यात ४ कसोटी, ४ वन डे व ४ ट्वेंटी-20 सामने होतील. मार्च ते मे या कालावधीत आयपीएल 2021चे आयोजन करण्याचा बीसीसीआयचा प्रयत्न आहे.

# कोरोनाचे नियम मोडल्यानं पाकिस्तानी खेळाडूला घरी हाकलले




पाकिस्तानी क्रिकेटपटू सध्या चुकीच्या कारणामुळे चर्चेत आहे. न्यूझीलंड दौऱ्यावर गेलेले पाकिस्तानी खेळाडू कोरोना नियमांचे काटेकोर पालन करत नसल्याचे CCTV फुटेज प्रसिद्ध करताना न्यूझीलंड सरकारनं त्यांना देशातून हद्दपार करण्याची वॉर्निंग दिली आहे. त्यात त्यांच्या ७ खेळाडूंचा कोरोना रिपोर्ट पॉझिटिव्ह आला. पाकिस्तानी खेळाडूंच्या या वर्तनावर माजी क्रिकेटपटू शोएब अख्तर यानंही टीका केली. हे कमी की काय पाकिस्तानी संघाचा कर्णधार बाबर आझम याच्यावर लाहोर येथील एका महिलेनं लैंगिग शोषणाचा आरोप केला.

आता पाकिस्तानचा २८ वर्षीय फिरकीपटू रझा हसन हा चर्चेत आला आहे. कोरोना नियमांचे उल्लंघन केल्यामुळे हसनची चर्चा आहे आणि त्याला थेट घरी हाकलण्यात आले आहे. पाकिस्तानच्या स्थानिक क्रिकेट स्पर्धा क्वैद-ए-आझम चषकमध्ये हसन नॉर्दर्न्स सेकंड XI संघाचे प्रतिनिधित्व करतो. त्याला आता घरी पाठवण्यात आले असून उर्वरित सामने खेळता येणार नसल्याचे, पाकिस्तान क्रिकेट मंडळाने स्पष्ट केले. हसननं वैद्यकिय टीम आणि हाय परफॉर्मन्स विभागाच्या परवानगीशिवाय बायो-सुरक्षा बबल मोडले. "वारंवार सूचना करूनही खेळाडूंनी नियम मोडणे, अत्यंत दुर्दैवी आहे. कोरोना नियमाचे काटेकोर पालन करणे, हे महत्त्वाचे आहे. हसननं ते नियम मोडले आणि शिस्तभंग केले,"असे पीसीबीचे हाय परफॉर्मन्स डायरेक्टर नदीम खान यांनी सांगितले. त्याला स्पर्धेतून हाकलण्यात आले आहे. २०१२च्या ट्वेंटी-20 वर्ल्ड कप स्पर्धेत हसननं ऑस्ट्रेलियाच्या ग्लेन मॅक्सवेल व शेन वॉटसन यांची विकेट घेतली होती. त्यानं १० ट्वेंटी-20 सामने खेळले आहेत. २०१५मध्ये प्रतिबंधीत द्रव्य सेवन केल्याप्रकरणी तो दोषी आढळला होता आणि त्याच्यावर दोन वर्षांच्या बंदीची कारवाई झाली होती.

# धावपटू कविता राऊत अजूनही नोकरीच्या प्रतीक्षेत

## अखेर राज्यपालांचे दरवाजे ठोठावले



नाशिक : राष्ट्रकुल स्पर्धेतील पदकासह थेट ऑलिम्पिकपर्यंत धडक देऊन नाशिकचे नाव जगाच्या नकाशावर पोहोचवणारी आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत यांच्या पदरी शासन दरबारी अद्यापच निराशा पडली आहे. सर्व प्रकारची पात्रता असूनही शासकीय सेवेत प्रथम श्रेणीच्या अधिकारी म्हणून नोकरी दिली जात नसल्याने कविताने अखेर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांची भेट घेऊन तिचे गाऱ्हाणे मांडले.

सावरपाड्यातील आदिवासी कन्येने दीड दशकांपासून राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धांमध्ये ठसा उमटवला होता. २०१० साली दिल्लीत झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत कविताने रौप्य पदकाला गवसणी घातली. त्याबद्दल कविताला खेळाडूंसाठी देण्यात येणारा सर्वोत्कृष्ट अर्जुन पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे.

शैक्षणिक क्षेत्रांत इयत्ता पाचवीच्या बालभारतीच्या पुस्तकात धावपटू कविता राऊत यांच्या संघर्षकथेचा प्रवास मांडण्यात आला आहे.

२०१४ पासून वर्ग एकच्या पदासाठी शासकीय सेवेत नोकरी मिळावी, म्हणून कविता राऊतने अर्ज केला होता. कवितानंतर अर्ज केलेल्या काही खेळाडूंची वर्ग एकच्या पदावर नियुक्ती झाली. कविताला मात्र, अजूनही नोकरीची प्रतीक्षाच आहे. त्या पार्श्वभूमीवर नोकरीसंदर्भात होत असलेल्या अन्यायाची कैफियत कविता राऊतने राज्यपाल भगतसिंग कोश्यारींपुढे मांडली.

# शापूरजी पालोनजीने पुण्यात आपले अस्तित्व बळकट केले हिंजवडीत सेन्सोरियम सुरू केले

मुंबई : भारताच्या सर्वात विश्वासार्ह रिअल इस्टेट ब्रँडपैकी एक, शापूरजी पालोनजी ग्रुपने पश्चिम पुणे येथील हिंजवडी येथे नवीन निवासी प्रकल्प सुरू करण्याची घोषणा केली आहे. ब्रँड जॉयविलेचा हा भारतातील सहावा प्रकल्प आहे. जॉयविले हे शापूरजी पालोनजी, एडीबी, आयएफसी आणि ॲक्टिस यांचे 200 मिलियन डॉलर्सचे व्यासपीठ आहे जे भारतातील महत्वाकांक्षी गृहनिर्माण प्रकल्प विकसित करतात.

नव्याने सुरू झालेल्या निवासी प्रकल्पाचे नाव सेन्सोरियम आहे जे पुण्यातील 'जॉयविले' चा तिसरा प्रकल्प असून त्यानंतर जॉयविले हडपसर एनेक्सी आणि जॉयव्हिले हिंजवडी यांचा समावेश आहे.

नुकत्याच पूर्व पुण्यात जॉयविले हडपसर एनेक्सीच्या प्रक्षेपण वेळी कंपनीने 800 हून अधिक अपार्टमेंटची विक्री केली आहे. जॉयविले हिनजावाडी 2018 मध्ये लाँच केले गेले होते.

प्रक्षेपणप्रसंगी बोलताना श्री.वेंकटेश गोपालकृष्णन (सीईओ, शापूरजी पालोनजी रिअल इस्टेट) म्हणाले, "विश्वस्त ब्रॅण्ड्सद्वारे दर्जेदार घरांची मागणी असणारी पुणेके आपल्यासाठी एक महत्त्वाची बाजारपेठ आहे. देशातील आघाडीच्या रिअल इस्टेट मार्केटमध्ये आपली उपस्थिती बळकट करण्याच्या आमच्या धोरणासह हे प्रकल्प जोडणे चांगले आहे. आम्हाला खात्री आहे की आमचा नवीन प्रक्षेपण प्रकल्प ग्राहकांच्या प्रीमियम राहण्याची अपेक्षा पूर्ण करेल. " विचारपूर्वक डिझाइन केलेल्या प्रकल्पात 75% हून अधिक हिरव्यागार जागा, 1.8 किमी चालण्याचे बुलेव्हार्ड, 2.8 एकर मध्ये बहु-स्तरीय संकेनगार्डन, वाहन मुक्त पोडियम, इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन आणि रिव्हर फ्रंट क्लबहाउस (अंदाजे 27,000 चौरस फूट) असेल.

# नेक्स्ट एज्युकेशनचे स्मार्ट लर्निंग ॲप 'लर्ननेक्स्ट+'

मुंबई : प्रत्येक विद्यार्थ्याला सर्वंकष सेल्फ-लर्निंग अनुभव सुलभ करण्याकरिता, भारतातील अग्रेसर स्मार्ट लर्निंग सोल्युशन प्रदाता, नेक्स्ट एज्युकेशन प्रा.लि. ने नुकतेच लर्ननेक्स्ट+ हे नवे फीचर आणले आहे. के-१२ विद्यार्थ्यांसाठी सहज उपलब्ध होणारा साथीदार असे लर्ननेक्स्ट+ हे स्मार्ट लर्निंग ॲप हे विद्यार्थ्यांना शैक्षणिक उत्कृष्टता मिळवण्याकरिता तसेच सर्व विषयांमध्ये भक्कम वैचारिक पाया विकसित करण्यात मदत करते.

या पुरस्कारप्राप्त कोर्सचा कंटेंट हा नेक्स्ट एज्युकेशनच्या तज्ज्ञांनी संशोधन करून तयार केलेला आहे. २० पेक्षा जास्त विषयांचे शिक्षण पुरवणारे लर्ननेक्स्ट+ हे २००० पेक्षा जास्त तासांचे संवादात्मक आणि आकर्षक एचडी व्हिडिओ लेसन्स तसेच संपूर्ण सराव चाचण्या पुरवते. हे सर्व प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असून कोठूनही त्यावर प्रवेश घेतला जाऊ शकतता. याद्वारे शिक्षण अधिक लवचिक होते.

यासोबतच, स्मार्ट लर्निंग ॲप हे एनसीएफ (नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क) आणि सीसीई (कंटिन्युअस अँड कॉम्प्रेहेन्सिव्ह इव्हॅल्युएशन) यांच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने ॲक्टिव्हिटी आधारित अभ्यासक्रमाचे अनुसरण करते. यात ६०० पेक्षा जास्त सिम्युलेशन्स आणि विज्ञानातील महत्त्वाच्या संकल्पनांसह एकत्रित अनुभव असून याद्वारे शिक्षणाला चालना मिळते. तसेच विविध विषयांबाबत अधिक स्पष्टपणा येतो.

नेक्स्ट एज्युकेशनचे संस्थापक आणि सीईओ ब्यास देव रल्हन म्हणाले, "केवळ पुस्तकातून घेतलेले शिक्षण, प्रत्येक विद्यार्थ्यांची शिकण्याची गरज भागवू शकत नाही. कारण, पाठ्यपुस्तकांमध्ये प्रामुख्याने अभ्यासक्रमावर आधारीत घटकांवर भर दिला जातो.

# युनियन बँक ऑफ इंडियाची महत्वपूर्ण कामगिरी

## पूर्वीच्या कॉर्पोरेशन बँकेच्या सर्व शाखांचे आयटी इंटिग्रेशन केले पूर्ण

मुंबई : सरकारी मालकीच्या युनियन बँक ऑफ इंडियाने तीन बँकांच्या एकत्रिकरणाच्या प्रक्रियेत आणखी एक महहत्त्वाचा टप्पा गाठला. आजच्या आयटी एकत्रीकरणानंतर, पूर्वीच्या कॉर्पोरेशन बँकेच्या सर्व शाखा (सेवा शाखा आणि विशेष शाखांसह) युनियन बँक ऑफ इंडियामध्ये पूर्णपणे एकत्रित झाल्या आहेत.

पूर्वीच्या कॉर्पोरेशन बँकेचे सर्व ग्राहक विक्रमी वेळेत युनियन बँकेच्या सीबीएसमध्ये यशस्वीरित्या स्थानांतरीत झाले आहेत. या यशसोबतच बँकेने इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, युपीआय, आयएमपीएस, एफआय गेटवे, ट्रेझरी आणि स्विफ्ट या सेवा पूर्वीच्या कॉर्प बँकेच्या ग्राहकांसाठी खुल्या केल्या असून याद्वारे ते युबीआयच्या शाखा आणि डिलिव्हरी चॅनल्सद्वारे अखंडपणे व्यवहार करू शकतील. बँकेने यापूर्वीच एटीएम स्विच आणि एटीएम टर्मिनल सहजपणे युबीआय नेटवर्कमध्ये स्थलांतरीत केले आहे.

संपूर्ण स्थलांतर विक्रमी वेळेत पूर्ण झाले असून ग्राहकांना अत्यंत कमी गैरसोय सोसावी लागली. यात ग्राहकांच्या अकाउंट नंबर, डेबिट कार्ड किंवा नेट बँकिंग क्रिडेन्शिअल्समध्येही कोणताही बदल करण्यात आला नाही. हे संपूर्ण स्थलांतर इन्फोसिस, ईवाय आणि बीसीजी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. बँकेने यापूर्वीच नवीन संस्था रचना, सुसंवादित उत्पादने आणि प्रक्रिया इत्यादीसह प्रशासकीय एकत्रिकरणाची प्रक्रिया पूर्ण केली आहे, हे सांगणे उल्लेखनीय ठरते.

युनियन बँक ऑफ इंडियाचे एमडी आणि सीईओ श्री राजकिरण राय जी म्हणाले, "सर्व ई-सीबी शाखा व डिलिव्हरी चॅनल्सचे पूर्ण एकत्रिकरण करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. याद्वारे आमच्या ग्राहकांसाठी मोठी संधी खुली झाली असून नवनवीन उत्पादने व सेवांची क्षमताही वाढली आहे. नियोजनानुसार, पुढील टप्प्यात ई-आंध्र बँकेच्या सर्व शाखा चालू आर्थिक वर्षात फिनॅकल १० मध्ये स्थलांतरीत होतील.

# लग्नसराईच्या काळासाठी फर्निचरचा ऑनलाइन शोध १.५ पट ते २ पट वाढला : फ्लिपकार्ट




बंगळुरु : डिसेंबर ते मार्च या काळात येणारा लग्नसराईचा मोसम पाहाता देशभरात वाढत्या संख्येने ग्राहक फर्निचरचा शोध ऑनलाइन घेत आहेत. कोविडमुळे घरीच राहाणे आवश्यक झाले आहे. शिवाय, ऑनलाइन खरेदी करण्यात अनेक फायदेही असतात जसे की, असंख्य उत्पादनांचा पर्याय आणि होम डिलिव्हरीची सेवा, त्यामुळे बेड्स, सोफा आणि डायनिंग टेबल अशा काही वस्तूंचा शोध ऑनलाइन घेण्यात बरीच वाढ झाली आहे.

फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने गेल्या काही महिन्यांत मागील वर्षीच्या याच काळाच्या तुलनेत विविध विभागांमधील फर्निचरच्या वस्तूंच्या शोधात १.५ पट ते दुप्पट वाढ अनुभवली आहे. लग्नसराईचा मोसम जवळ आलेला असताना ऑनलाइन फर्निचर विकत घेण्याचा ग्राहकांचा वाढता कल यातून दिसून येतो. महानगरे आणि प्रथम श्रेणी शहरांमधून घेतलेल्या शोधात अनुक्रमे दीडपट आणि १.७ पट वाढ झाली आहे. मात्र, मागील वर्षीच्या तुलनेत दुपटीहून अधिक वाढ अनुभवत तृतीय श्रेणी शहरे आघाडीवर आहेत. विविध शहरांमध्ये लग्नसराईची खरेदी म्हणून बेड्स आणि सोफ्यांचा सर्वाधिक शोध घेतला गेला. तर, जागेचा अधिक चांगला विनियोग करणाऱ्या सोफा कम बेडसारख्या परवडणाऱ्या दरातील आणि बहुपयोगी फर्निचरची मागणीही वाढत आहे.

ही वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी फ्लिपकार्ट आपल्या १०००० हून अधिक विक्रेत्यांसह येत्या मोसमात सर्व प्रकारचे फर्निचर सहज उपलब्ध व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ते कशाप्रकारच्या फर्निचरचा शोध घेतात, किमती काय हव्या असतात, अशा प्रकारची ग्राहकांची माहितीसुद्धा कंपनीतर्फे पुरवली जात आहे.

फ्लिपकार्टच्या फर्निचर आणि बीजीएमएचचे वरिष्ठ संचालक निशांत गुप्ता म्हणाले, ₹मोठ्या संख्येने ग्राहक यंदाच्या लग्नसराईच्या काळासाठी घर सजवण्याचा विचार करत आहेत. त्यामुळे सोफा आणि बेड्स अशा विविध फर्निचर विभागात शोध घेण्याचे प्रमाण प्रचंड वाढल्याचे दिसून येत आहे. हा ट्रेंड सर्वच शहरांमध्ये दिसून येत असला तरी मागील वर्षीच्या तुलनेत तृतीय श्रेणी शहरांमध्ये हे प्रमाण दुपटीने वाढले आहे. कोविडपश्चात काळात ऑनलाइन खरेदी करणाऱ्या छोट्या शहरांमधील ग्राहकांची संख्या वाढत असल्याचे सातत्याने स्पष्ट होतेच आहे. फ्लिपकार्टमध्ये आम्ही लग्नसराईच्या ग्राहकांसाठी एक खास ऑनलाइन स्टोअर तयार केले आहे. इथे त्यांना खरेदीचा खास अनुभव मिळेल आणि यंदाच्या लग्नसराईच्या मोसमात फर्निचरमधील वस्तूंचे व्यापक पर्याय उपलब्ध असावेत यासाठी आमच्याकडे मोठ्या संख्येने असलेल्या विक्रेत्यांसोबत आम्ही प्रयत्न करत आहोत.₹

यंदा फ्लिपकार्टने आपला फर्निचर विभाग व्यापक करत द्वितीय आणि तृतीय श्रेणी शहरांमधील अस्सल, देशी डिझाइन आणि घटकांचा वापर करणाऱ्या विक्रेत्यांना आपल्या व्यासपीठावर आणले आहे. देशभरातील १०००० हून अधिक विक्रेत्यांकडील सुमारे ३.५ लाख फर्निचर उत्पादने, शिवाय सेवा देता येतील अशा १०० टक्के पिनकोडवरील डिलिव्हरी आणि सर्व महत्त्वाच्या पिनकोडवर इन्स्टॉलेशन सेवा अशा सेवांमधून फ्लिपकार्ट ग्राहकांना त्यांचे घर अगदी सहजसुंदररित्या सजवण्यात साह्य करत आहे. 'नो कॉस्ट ईएमआय' आणि 'पे लेटर' अशा फ्लिपकार्टच्या परवडणाऱ्या दरांसाठीच्या योजना अत्यंत लोकप्रिय आहेत. जवळपास ५० टक्के ग्राहक पेमेंट करताना या योजनांचा लाभ घेतात.

# कलर्सचा आगामी शो- नमक इश्क का

नमक इश्क का मध्ये छमछमच्या भूमिकेत श्रुती शर्मा एक रोमँटिक नाट्य सादर करत, कलर्सने नमक इश्क का च्या शुभारंभाची तयारी केली आहे, भपकेबाज छमछमचा प्रवास, जिच्याकडे तिच्या धंद्यामुळे लोक तिरस्काराने पाहतात, पण तिचे लग्न मुंबईतील एका प्रतिष्ठित कुटुंबात झाले आहे. जरी छमछम परंपरेने नाचणारी म्हणून ओळखली जात असलेली एक नर्तिका असली तरी, ती विचारी आणि नैतिकदृष्ट्या नीतीमान व्यक्ती आहे. एक अनाथ म्हणून वाढलेली छमछम पोट भरण्यासाठी आणि तिच्यावर अवलंबून असणाऱ्यांची काळजी घेण्यासाठी नर्तिका बनते. छमछमची भूमिका साकारण्यासाठी अभिनेत्री श्रुती शर्माची निवड करण्यात आली आहे.

श्रुती शर्मा म्हणाली, "ही भूमिका साकारण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. छमछम हे खूप असाधारण पात्र आहे आणि ते साकारताना मला एक अभिनेत्री म्हणून अभिनयासाठी खूप वाव आहे. शोची संकल्पना खूप सशक्त आहे आणि या पात्राची पार्श्वभूमी आणि तिचा प्रवास नक्कीच सामाजिक समज बदलून टाकतील. ही खूप वैशिष्ट्यपूर्ण संधी मला देण्यासाठी मी कलर्सची अत्यंत आभारी आहे आणि शो मध्ये काम करण्याची आणि त्यात माझे सर्वस्व ओतण्याची मी वाट पहात आहे."

## ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवरील डॉक्युसीरीज, 'सन्स ऑफ द सॉईल

# जयपूर पिंक पँथर्स' मध्ये दिसणार महाराष्ट्राचा मुलगा, निलेश साळुंखे!

अभिषेक बच्चन याच्या मालकीची जयपूर पिंक पँथर्सवरील 'सन्स ऑफ द सॉईलः जयपूर पिंक पँथर्स' या डॉक्युसीरीजचा प्रीमियर 4 डिसेंबर पासून ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर प्रेक्षकांच्या भेटीला येतो आहे. या ॲमेझॉन ओरिजिनल डॉक्युसीरीजमध्ये छोट्याशा शहरातील कबड्डीपटूंचा आजवरचा प्रवास आणि त्यांचे या खेळाचे स्वप्न साकार करण्यातील त्याग आणि त्यातील उत्कटतेच्या भावनेची साक्ष देते.

महाराष्ट्राचा एक प्रामाणिक कबड्डीपटू आणि रेडर निलेश साळुंखे, त्याचे देखील आयुष्य या खेळाने कसे बदलले त्याविषयी सांगतो, तो म्हणतो, मी अगदी शून्यापासून सुरुवात केली आहे, माझ्याकडे राहण्यासाठी योग्य घर नव्हते, मी आणि माझे कुटुंब राहत होतो ते अगदी लहान घर होते. आज मी जिथे आहे तिथे पोचणे ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे, मला खूप संघर्ष केला आहे. प्रशिक्षकांनी मला साथ दिली आहे, योग्य आहार घेण्यासाठी देखील माझ्याकडे पुरेसे पैसे नव्हते, ज्यासाठी माझ्या प्रशिक्षकांनी मला मदत केली. माझा महिंद्रा आणि महिंद्रा, आणि एअर इंडिया यांच्यासोबत करार होता. मी महा कबड्डी देखील खेळलो जिथे मी अनेक उत्कृष्ट पारितोषिके मिळवली आहेत.

तो पुढे म्हणाला की, प्रो कबड्डीमध्ये आल्यानंतर मी नवीन घर विकत घेतले. मी इतर संघात असताना मला नेहमी जयपूर पिंक पँथर्सकडून खेळण्याची इच्छा होती आणि मला मागच्या वर्षी ही संधी मिळाली. मी चार वेळा नॅशनल खेळलो आहे आणि मला जेपीपीकडून खेळणे सुरू ठेवण्याची इच्छा आहे. माझा या मालिकेतील प्रवास



यामध्ये बघायला मिळेल.

या मालिकेची निर्मिती बीबीसी स्टुडिओ इंडियाने केली असून बाफटा स्कॉटलंडचा दोन वेळा विजेता राहिलेल्या ॲलेक्स गेल दिग्दर्शित ही मालिका प्रो कबड्डी लीगच्या सातव्या सत्रातील जयपूर पिंक पँथर्सचा प्रेरणादायक प्रवास चित्रित करीत आहे.

अमेझॉन ओरिजिनल सीरिज 'सन्स ऑफ द सॉईलः जयपूर पिंक पँथर्स'चा प्रीमियर 4 डिसेंबर पासून प्राइम व्हिडिओवर 200 हून अधिक देशांमध्ये व प्रांतांमध्ये दिसणार आहे.

मुद्रक. प्रकाशक **श्री. तुषार श्रीराम खानविलकर** यांनी मालक **सौ. मनाली तुषार खानविलकर** यांच्याकरीता हे दैनिक सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन प्रा. लि., डब्ल्यू-२३०, खैरणे एमआईडीसी, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया, ठाणे-बेलापुर रोड, नवी मुंबई - ४०० ७१० येथे छापून १९, डी. पी. वाडी घोडपदेव रोड. के. एल. बोरकर मार्ग, भायखळा, मुंबई ४०० ०३३ येथे प्रसिद्ध केले. **संपादक-महेंद्र शांताराम गावडे** पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जाबबदारी यांची राहिल. सर्व वाद आणि दावे मुंबई न्यायालयीनकक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहिल.) भ्रमणध्वनी - ८८७९९६७७७० Email : theglobaltimesdaily13@gmail.com, siddhakalaprint13@gmail.com **कार्यकारी संपादक : रामचंद्र पुरूषोत्तम खडपे,**